शुक्रवार, १९ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२५१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 19 MAY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-251 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5




## पावशाने दिले पावसाचे संकेत



आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** पावसाचा शुभसंकेत देणारा पावशा पक्षी सध्या पैठण तालुक्यातील विविध भागांत दिसत आहे. शेतशिवारात आता कामांची लगबग वाढली असून, नांगरणी, औताची मशागत, बांद पेटवणे आदी कामांना वेग आला आहे. त्यातच पक्षाची किलबिलाट सकाळ सायंकाळी कानी पडु लागल्याने, पेरते व्हा, पेरते व्हा' अशी पावशा पक्ष्याची शीळ रानावनात घुमायला लागली आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यात हिरवं स्वप्न तरळू लागलं. जायकवाडीच्या धरणामुळे पैठण पाणिदार तालुका म्हणून ओळखला जातो. गोदावरी नदीवर बंधारे उभारल्याने गोदावरीच्या तटावर तसेच नाथसागरावर देशी आणि विदेशी पक्ष्यांचे येथे वास्तव्य आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला शेतकऱ्यांना पेरते व्हा, असा संदेश पावशा पक्षी देतो. सध्या शेतशिवारात या पक्ष्याची साद घुमत आहे. त्यामुळे लवकरच पाऊस कोसळेल अशी आस शेतकऱ्यांना आहे. या पावशा पक्षाचा सुंदर व्हिडीओ पैठणचे पक्षी मित्र सुनील पायघन सर यांनी आपल्या कॅमेरात कैद केला यात स्पष्ट पावशा जणू शेतकऱ्यांना साद घालतोय की 'पेर्ते व्हा, पेर्ते व्हा' त्यामुळे पाऊस वेळेवर आला तर आपली पंचाईत नको म्हणून प्रत्येक शेतकरी मशागत करण्यात व्यस्त झाला आहे. अशातच पावशा पक्ष्याने शुभसंकेत दिले. राखाडी रंगाच्या या पक्ष्यावर सोनेरी रंगछटेचे पट्टे असतात. हा पक्षी स्थानिक स्थलांतर करणारा असून, कोकिळेच्या वर्तनाचा आहे,असा हा पक्षी ग्रामीण भागात शेतकऱ्यांना पेरणीसाठी प्रवृत्त करीत आहे.

पावशा पक्ष्याचे इंग्रजी नाव 'इंडियन प्लॅनटिव्ह कुकू' असून, तो फारसा आकर्षक नाही. मात्र, त्याच्या आवाजात गोडवा आहे. अळ्या, कीटक, फळे हा त्याचा आहार आहे. पैठण परिसरात शेतशिवारातून त्याची हाक ऐकायला येत आहे.
–विलास पायघन सर, पक्षी मित्र, पैठण

# बैलगाडा शर्यतीला परवानगी

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : गेल्या अनेक महिन्यांपासून अवघ्या महाराष्ट्राला प्रतीक्षा असणाऱ्या बैलगाडा आणि जल्लीकट्टू खेळांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. डिसेंबर महिन्यात यासंदर्भातली सुनावणी पूर्ण झाली होती. तेव्हा याबाबतचा निकाल राखून ठेवला होता. अखेर गुरुवारी यासंदर्भातला निकाल न्यायालयाने दिला असून त्यानुसार महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यती, तामिळनाडूमधील जल्लीकट्टू आणि कर्नाटकमधील कम्बाला या खेळांना परवानगी दिली आहे. अशा खेळांमध्ये प्राण्यांचे हाल होत असल्याचा दावा करणाऱ्या याचिका प्राणीमित्र संघटनांनी केल्या होत्या. त्यावर अखेर न्यायालयाने निकाल दिला आहे.**

महाराष्ट्रात बैलगाडा शर्यत, तामिळनाडूमध्ये जल्लाकट्टू आणि कर्नाटकमध्ये कम्बाला या खेळांसाठी संबंधित तिन्ही राज्य सरकारांनी त्या त्या राज्यांसाठी वन्यजीव संरक्षण कायद्यात काही सुधारणा केल्या होत्या. त्यानुसार त्या त्या राज्यांनी या खेळांना मान्यताही दिली होती. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. यासंदर्भात सविस्तर सुनावणी घेऊन डिसेंबरमध्ये हा निकाल सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवला होता. अखेर आज त्यासंदर्भातला निकाल आला आहे. राज्य सरकारांनी पारित केलेल्या कायद्यांना आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळून लावली आहे. सर्वोच्च न्यायालयानेच २०१४मध्ये जल्लीकट्टू आणि त्यासारख्या खेळांवर बंदी घालण्याचा निर्णय दिला होता. त्यानंतर राज्य सरकारांनी या कायद्यातच सुधारणा करून नवीन विधेयक मंजूर केले होते. न्यायालयाने यासंदर्भातल्या कायद्यात सुधारणा करण्याचा राज्य सरकारांचा अधिकार यावेळी मान्य केला. तामिळनाडूमध्ये जल्लीकट्टू गेल्या शतकाहून अधिक काळापासून चालू आहे. हा खेळ तामिळनाडूच्या संस्कृतीचा भाग आहे की नाही हे ठरवण्याचे काम न्यायालयाचे नाही. जर विधिमंडळाने असे ठरवले असेल की जल्लीकट्टू तामिळनाडूच्या संस्कृतीचा भाग आहे, तर न्यायव्यवस्था त्याहून वेगळी भूमिका घेऊ शकत नाही. यासंदर्भात निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार विधिमंडळाला आहे. हीच बाब महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यत आणि कर्नाटकमधील कम्बाला या खेळांनाही लागू होते, असे न्यायालयाने यावेळी नमूद केले.



- सर्वोच्च न्यायालयाने आज दिलेला निर्णय महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण निकाल आहे. गावांत देशी खिलार जातीचा बैल प्रामुख्याने शर्यतीत पळवला जातो. मधल्या काळात शर्यत बंद असल्यामुळे हजारो बैल कत्तलखान्याकडे गेली. शेळीची किंमत जास्त होती, पण बैलाच्या खोंडाची किंमत कमी झाली होती. मी सर्वोच्च न्यायालयाचे या निर्णयासाठी आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिली.
- ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. अनेक वर्षं बैलगाडा मालकांनी हा लढा दिला आहे. हे सर्वांचं यश आहे. मी सरकारचंही मनापासून आभार मानतो. मविआचं सरकार असताना तत्कालीन पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार यांनी हिरीरीनं पुढाकार घेऊन हा खटला उभा राहण्यासाठी प्रयत्न केले. पहिल्या टप्प्यात अटी-शर्थींसह परवानगी दिली होती", अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांनी दिली आहे.

# जालखेड येथील रणरागिणींनी पकडली अवैध दारु

## दारु विक्रेत्याला रंगेहात पकडून दिले पोलिसांच्या ताब्यात


आधुनिक केसरी न्यूज


लखमापूर : दिंडोरी तालुक्यातील जालखेड येथील बचत गटाच्या महिलांनी अचानक दारू विक्रीत्याला रंगेहात पकडून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. जालखेड ता. दिंडोरी येथे राजरोसपणे दारु विक्री होत असून अवैध धंदे सुरू आहेत. दारू विक्रीमुळे गावातील नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शाळेत जाणारी लहान-लहान मुले व अनेक तरुण मंडळी व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत. याबाबत अनेक वेळा ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन तक्रारी नोंदविलेल्या, तसेच दिंडोरी पोलिस निरीक्षक यांना वेळोवेळी निवेदनही दिले आहे. परंतु अद्याप पावेतो निवेदनाचा कुठल्याही प्रकारचा विचार होऊन गावात सुरू असलेले अवैध धंदे बंद केलेले नाही. तसेच दारूमुळे गावात मोठ्या प्रमाणावर चोऱ्या होत आहे. गावातील बचत गटाच्या महिलांनी गुरुवारी सकाळी 11 वाजता समक्ष दारू पकडून दारु विक्रेत्याला चोप देण्यात आला. त्यानंतर दिंडोरी पोलिसांना दुरध्वनी करुन दारु विक्रेत्याला व साठवून ठेवलेला दारुच्या बाटल्या पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तालुक्यातील अनेक ठिकाणच्या परिसरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट झाला असून अवैध धंद्यांच्या विरोधात पोलिस अधिक्षक शहाजी उमाप यांनी भरारी पथके तयार करुन संपूर्ण जिल्हाभर कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत सर्वात जास्त कारवाई दिंडोरी तालुक्यात करण्यात आली आहे. आता तरी स्थानिक पोलिसांनी कारवाई न केल्यास तालुक्यातील दारुविक्रेत्याच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा येथील महिला वर्गांनी दिला आहे. दिंडोरी पोलिसांनी योग्य ती दखल घेवून तालुक्यातील अवैध धंद्यावाल्यावर कडक कारवाई करत अवैध धंदे बंद करावे, अशी मागणी केली आहे. यावेळी मंगला मडके, अंजना झनकर, शांताबाई झनकर, रेखा इंगळे, गंगुबाई शेखरे, योगिता चौधरी, सुरेखा झनकर, राजश्री भुरकुड, कमल झनकर, अश्विनी इंगळे, रोहणी चौधरी, ताईबाई झनकर, संगीता गायकवाड, सविता चौधरी, वैशाली चौधरी, इंदुबाई इंगळे, अनिता रोकडे, रेश्मा इंगळे, गायश्री शेवरे आदींच्या सह्या आहेत.



अनेक वेळा दारु विक्रेत्याला जालखेड येथील महिलांनी व पोलिसांनी दारु विक्री बंद करण्याचे सांगितले त्यामुळे महिलांनी आज दारुसह रंगेहात पकडून पोलिस बाळकृष्ण पजई यांना संपर्क करुन त्यांना बोलावून त्यांच्या ताब्यात देण्यात आले. त्यामुळे या दारुविक्रेत्यावर कठोर कारवाई करावी.
**योगिता चौधरी, (जालखेड महिला)**

महिला अनेक वेळा दारु पकडून देता मात्र गुन्हा दाखल करुनही दारु विक्रेत्यांना सोडले जाते. त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. दोन तीन वेळेस दारु विक्रेत्याला पकडल्यास त्यावर तडीपार ही कारवाई झाली पाहिजे. तरच अवैध धंदे बंद होतील, तालुक्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये खुले आम सुरु असून त्याकडे पोलिसांचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.
**ज्योती देशमुख, (सामाजिक कार्यकर्त्या लखमापूर)**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# चला एका अनोख्या सफरीवर...

आधुनिक केसरी

हॅलो छोट्या दोस्तांनो, नमस्कार. कसे आहात ? मला माहिती आहे की तुम्ही नक्कीच आनंदात असणार ! का म्हणून काय विचारताय ? लेकांनो, अरे तुम्हाला सध्या सुटी आहे. मे महिना म्हणजे धमाल मस्तीचा, आनंदाचा. शाळेची वणवण नाही, पालकांची तणतण नाही. म्हणून तर म्हणतोय की तुम्ही आनंदात असणार. खरं तर मला खूप दिवस झाले तुमच्याशी बोलायचं होतंच. पण काय करणार ? तुम्ही तुमची शाळा, परीक्षा, निकाल यात बिझी आणि मी माझ्या कामात. पण ' ऋतुपर्ण ' मासिकाचे संपादक असलेल्या सुरेंद्रकाका गोगटेंचा मला फोन आला. मला म्हणाले छोट्या दोस्तांसाठी विशेषांक काढतोय सर आणि तुम्ही मुलांसाठी काहीतरी लिहा. त्यामुळे तुमच्याशी बोलण्याची ही संधी मला त्यांनी मिळवून दिली. मी आज तुमच्याशी मनमोकळं बोलणार आहे. असा काही खास कुठलाही विषय नाही. आपल्याला फक्त गप्पा मारायच्या आहेत. तुमच्याशी बोलताना मला माझे लहानपणीचे दिवस आठवतात. एका अगदी लहान खेडेगावात माझं शिक्षण झालं. आमची ती शाळा जिल्हा परिषदेची होती. शाळेची इमारत कौलारू आणि जुन्या पद्धतीची होती. वर्गातल्या जमिनीवर फरशीसुद्धा नव्हती बरं का दोस्तांनो ! जमीन तर शेणानं सारवावी लागायची. तुम्ही म्हणाल, ' शी, असली कसली हो तुमची शाळा ? किती घाण वास येत असेल ! ' पण तसं अजिबात नव्हतं बरं का दोस्तांनो. शाळा सुटली की घरी जाण्यापूर्वी कोणीतरी ती शाळा सारवून ठेवायचं. दुसऱ्या दिवशी सकाळी शाळा भरेपर्यंत ते छान वाळलेलं असायचं. वास वगैरे तर अजिबात यायचा नाही. जमीन स्वच्छ, वर्ग स्वच्छ, मोकळ्या आणि मोठ्या खिडक्या. सगळं कसं प्रसन्न वातावरण. शिपाई किंवा कोणीतरी विद्यार्थीच शाळा सुरु होण्यापूर्वी शाळेची घंटा वाजवायचा. गाव छोटं असल्यानं घंटेचा आवाज साऱ्या गावात लगेच ऐकू जायचा. पहिली घंटा झाला की मुलं घरून निघायची आणि दुसऱ्या मिनिटाला शाळेत हजर ! मग छान बाहेरच्या मैदानात शिस्तीनं उभं राहायचं, प्रार्थना, राष्ट्रगीत म्हणायचं.





## आनंदी पहाट

# अतिविचार निर्माण करतात विकार

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

राग किंवा चिडचिड ही प्राथमिक भावना आहे, कारण ती घटनेचा थेट परिणाम म्हणून उद्भवली जाते. आपल्याला काळजी असलेल्या एखाद्या व्यक्तीचे नुकसान लक्षात येऊ लागल्यावर आपल्याला वाटणारी प्राथमिक भावना म्हणजे दुःख असते. दुसरीकडे अशावेळी आपले फारसे लक्ष जात नाही, कारण त्या दुय्यम भावना असतात, कमी उपयुक्त असतात. भावनांवर नियंत्रण ठेवता येत नाही हे तात्पुरते असू शकते. हे रक्तातील साखर कमी होणे किंवा झोपेच्या कमतरतेमुळे थकवा यासारख्या गोष्टीमुळे होऊ शकते. तथापि, काही लोक दीर्घकालीन स्थितीमुळे

त्यांच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यास सतत असमर्थता अनुभवतात. जेव्हा आपण राग व्यक्त करतो अथवा चिडचिडे होतो, तेव्हा आपल्या शरीरात हार्मोन्सचा पूर निर्माण होतो, जो शरीरात तीव्र प्रतिक्रियांना उत्तेजित करतो. हृदयाची धडधड वाढणे, मनाची धावपळ तसेच अस्थिरता वाढणे, तळहाताला घाम येणे, अल्पकालीन स्मरणशक्ती कमी होणे अशा अनेक अनुभव आपली चिडचिड झाल्यास येतात. मानसिक तणाव पातळीच्या वाढीमुळे आपल्या आंतरिक प्रतिसादात एखाद्या व्यक्तीला रडू यायला लागते. चिंताग्रस्त होण्याचे विकार वयानुसार वाईट होतातच असे नाही, परंतु चिंताग्रस्त लोकांची संख्या वयाबरोबर वाढत मात्र जाते. वृद्धापकाळात अधिक चिंता करण्याची प्रवृत्ती होते आणि मध्यमवयीन प्रौढांमध्ये सर्वात ती सामान्य असते. चिंता, विकार हे सर्वात सामान्य मानसिक विकार आहेत आणि जवळजवळ ३०% प्रौढांना त्यांच्या जीवनात कधीना कधी तरी प्रभावित करतात. परंतु चिंता विकार उपचार करण्यायोग्य असतात आणि अनेक प्रभावी उपचार देखील उपलब्ध असतात. अशा प्रकारचे उपचार बहुतेक लोकांना सामान्य जीवन जगण्यास मदत करतात. चिडचिड होण्याची गुणवत्ता किंवा स्थिती ही प्रत्येकाची निरनिराळी असते.



आधुनिक केसरी

रामकृष्ण हरि | अंतरंग ||
अधरावरती | ठेवूनी मुरली ||
हरीने हरीली | भ्रांत सारी ||१||
पंचप्राण फुंकी | वेणुत मधाळ ||
अबिर गुलाल | सूर होती ||२||
निर्गुण रूपास | साकारी सगुण ||
बासरीची धून | चैतन्याची ||३||
वेडावली राधा | भुलले गोकुळ ||
अंतर्यामी मेळ | एक झाला ||४||
मनाच्या गाभारी | चित्त झाले दंग ||
वृंदावनी रंग | सांज ल्याली ||५||
अधरी मुरली | स्थिर विटेवरी ||
रामकृष्ण हरि | अंतरंग ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

सिंहस्कन्धां जयामम्बां नित्यं
भक्तहिते रताम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं
नमाम्यहम्|| ३ ||

भक्तांच्या हितामध्ये नित्य रत असणाऱ्या सिंहारूढ जया अंबा ही नामे जिची आहेत, अशा दुर्गा देवीला मी तीनही तापांच्या शांतीसाठी नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

जो सुख पूर्वहिं भोगिया, सुखन ज्ञान जेहि माहिं । स्मरण देखि ता लोभिया, राग कहत हौं ताहिं ।।२४७।। जो जो दुख जिसमें भयो, पूर्व काल ही माहिं । रोष साधन स्मरण में, द्वेष कहैं बुधि ताहिं ।।२४८ ।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/२४७, २४८

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

जे सुख पूर्वी अनुभवास आलं , ज्या पदार्थांच्या प्राप्तिमुळे सुखाचा बोध झाला, त्यांना बघून अथवा स्मरण करून त्यांच्याप्रति जे आकर्षण निर्माण होते, त्यास राग म्हणजेच आसक्ती म्हटलं जातं. ज्या-ज्या पदार्थां पासून अथवा व्यक्तीं पासून पूर्वी दुःखाचा अनुभव झाला, त्यांच्या स्मरणाने जो क्रोध उत्पन्न होतो, विद्वान त्यास द्वेष असे म्हणतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सुक्ष्म आशंकानिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

अचूक निर्णय घ्यावे लागतात. खरं तर प्रत्येक प्राण्यात ज्ञानही असते व अज्ञानही असते त्याच्या बुद्धीची पात्रता सारखीच आसते. सम्यकता साधून स्वतः चा संसाराचा आणि या अफाट विश्वाचा डोलारा सांभाळण्याची ताकद परमात्म्याला जवळ करून मिळवावी लागते. म्हणजेच सम्यक ज्ञान, आचार, विचार तुमच्या अंगी असणे महत्वाचे आहे. यासाठी तरी संतसाहित्याचा अभ्यास असणे गरजेचे आहे. मी खुप साहित्य वाचले, माझे अनेकानेक स्तोत्रे पाठ आहेत. मी खुप तिर्थक्षेत्र पाहून आलो. हे म्हणण्याला काहीच अर्थ नाही. पण सामाजिक व सांस्कृतिक नितिमत्ता जर शुन्य असेल तर या धार्मिक अधिष्ठानाला काहीच अर्थ रहात नाही. ती नुसतीच पोपटपंची होते. स्वतः पुरतं न जगता समाजासाठी जगा. म्हणून म्हणते मित्रांनो यासाठी सम्यक ज्ञान तुमच्या कडे असणे गरजेचे आहे. समर्थांनी यासाठी भारतभर पायी फिरून तिर्थाटन केले.

# खरी तळमळ लागली म्हणजे संत भेटतो

आधुनिक केसरी

असंताची आवड नाहीशी होईल तेव्हाच संत हवासा वाटेल. विषय आपल्याला त्रास देतात, पण ते सोडावे कसे हे समजत नाही. जंगलात सापडलेल्या माणसाप्रमाणे आपले झाले आहे. आपली वाट चुकली आहे असे ज्याला वाटेल तोच जंगलातून बाहेर पडण्याची वाट विचारतो. 'आता वय फार झाले, काळाच्या स्वाधीन होण्याची वेळ आली, रामा तूच आता तार,' अशी तळमळ लागाली, तरच संतसहवास लाभेल. सत्संगत हवी असे आपण नेहमी म्हणतो खरे, पण मागतो मात्र ' असत् ' ; मग आपल्याला सत्संगत मिळेल कशी ? स्वतःला कसे विसरावे हे कळण्याकरताच संताला शरण जावे. आपले विस्मरण म्हणजे भगवंताचे स्मरण. वडील दूर आहेत, त्यांचे पत्र नाही, म्हणून काळजी करतो; पण जन्मापासून भगवंत दूर आहे, त्याची तळमळ का लागू नये ? आपण नामस्मरण करतो, पण ज्याचे नाम घेतो तो कोण, असा विचार करतो का ? विषय सोडल्याशिवाय राम कसा भेटणार ? रामही हवा आणि विषयही हवा, हे जुळणार कसे ? मला जोपर्यंत चिमटा घेतलेला कळतो तोपर्यंत



कर्म मार्गानेच जाणे जरूर आहे. कर्ममार्ग सांभाळताना, 'कर्ता मी नव्हे' ही भावना सांभाळणे जरूर आहे. जो खरा अनुभवी आहे तो बोलणारच नाही, आणि बोललाच तर तो अगदी थोडे बोलेल; तो उत्तम होय. अनुभवी खरा, पण नाइलाज म्हणून जो बोलतो तो त्याच्यापेक्षा थोडा कमी समजावा. कोणीतरी बोलल्याशिवाय लोकांना कळणार कसे, म्हणून हे लोक कमीपणा पत्करूनही पुष्कळ बोलतात. परंतु अनुभव नसताना उगीच शब्दपांडित्य करणारे हे अगदी खालच्या दर्जाचे होत. ज्याला अनुभव कमी त्याला शब्दपांडित्य फार असते. जो जगाला फसविणार नाही आणि स्वतःही फसणार नाही, असाच मनुष्य जगाला मार्गाला लावू शकेल. कित्येक साधू दगड मारतात किंवा शिव्या देतात, तरी लोक त्यांच्या मागे लागतात, कारण त्यांच्या शिव्यादेखील आशीर्वादाप्रमाणे असतात. हे कित्येक लोकांच्या ध्यानी येत नाही. एखादा मुलगा बापाला म्हणू लागला की, 'मी इतका जवळचा, पण मला मिळतो मार; आणि तो लांबचा पोर, त्याचे मात्र लाड !' पण तो मारच आपल्या हितासाठी असतो, हे त्याला नाही समजत ! साधूच्या बोलण्यामध्ये किंवा मारण्यामध्येसुद्धा दुष्ट बुद्धी नसते. संत जे काही बोलतील ते जगाच्या कल्याणाकरताच असते. संत निःस्वार्थी असतात. ते तळमळीने सांगतात.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् । उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥ स्पष्टीकरण - हा आपला, हा परका असे म्हणून वागणुकीत पक्षपात करणे बरे नव्हे. तसे पाहिले तर सर्व जगच आपले आहे. पण तेवढी उडी सामान्य माणसांना झेपत नाही. पण सगळ्यांसाठी कष्ट करणे शक्य नसले, तरी आपले कुटुंब, आपले इष्टमित्र आणि आपले शेजारीपाजारी एवढयांच्या पुरते आपले तरी मन मोठे करायला हरकत असू नये. तुम्ही तुमचे मन मोठे केले तर तुम्हाला तुमचे कर्तव्यही आपोआप समजेल.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १९ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# संत ज्ञानेश्वर उद्यानातील कामाचे आज ना. भुमरेंच्या हस्ते भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** गेल्या काही वर्षापासून पाटबंधारे विभागाच्या आती दुर्लक्षतेमुळे संत ज्ञानेश्वर उद्यानाचे जगंल झाले. कर्मचारी व जबाबदार अधिकार्यांनी नेहमीच या उद्याना कडे दुर्लक्ष करत राहील्याने आज फुलांच्या जागी बोरी बाभळी उगल्याने गेल्या पाच वर्षापासून बंदच होते. याविषयी पैठणकर नागरीकांनी वेळोवेळी पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्याकडे उद्यान विकासाबाबत लक्ष देण्यासाठी प्रयत्न केले असता आनेकदा उद्यान विकासाबाबत कोटीच्या घोसना झाल्या परंतु विकास कामे झाले नाही. आता मात्र पैठणचे आमदार तथा औरंगाबादचे पालकमंत्री यांनी संत ज्ञानेश्वर उद्यान चालु करण्यासाठी निधी उपलब्ध करून देवुन प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली असुन शुक्रवार १९ रोजी उद्यानातील विविध विकास कामांचा भुमिपुजन ना.संदिपान भुमरे यांच्या हस्ते होणार असुन लवकरच पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यान पर्यटकासाठी सज्ज होणार आसून यात प्रमुख्याने संगीतकारंजे( फाऊन्टन),अंतर्गत रस्ते, पार्किंग,ऑफीस,इत्यादी कामाचा समावेश असुन यामुळे कमीत कमी कालावधीत पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यान लवकरच पर्यटकासाठी सुरु होईल आशी नागरिकांना अशा आहे.



गेल्या काही वर्षापासून पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यान बंद राहील्याने पैठण शहरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या कमालीची घटली होती .त्यामुळे शहरातील व्यापारी वर्गात निराशा पसरली होती, पैठणकर तसेच नागरिकांनी नेहमीच उद्यान सुरु करावे आशा मागण्या केल्या,परंतु आता पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या विशेष प्रयत्नामुळे विविध विकास कामे करुन उद्यान लवकरच सुरु होवुन पैठणच्या व्यापारात नक्कीच भर पडेल त्यामुळे सर्व पैठणकरांच्या वतीने आम्ही संदिपान भुमरे साहेबांचे आभार व्यक्त करतो . **– सोमनाथ परदेशी, मा .नगराध्यक्ष**

# नागनाथ जिंकले यांना राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** अनंत बहुउद्देशीय सेवा संस्थेच अध्यक्ष एस्. एच. बेग यांनी हा राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार धर्माबाद तालुक्यातील मनुर येथील सामाजिक कार्यकर्ते नागनाथ भिमराव जिंकले यांना जाहिर केला आहे. हा पुरस्कार १७ मे २०२३ रोजी प्रदान होणार आहे. नागनाथ भिमराव जिंकले यांचे धर्माबाद तालुक्यात येथे गेली १५ वर्षापासून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य असल्याने त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्यासारखा आहे तसेच जनजागृती पर उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून १७ मे रोजी अहमदनगर येथील इंद्रायणी हॉटेल जवळील एन. आर. लॉन येथे त्यांना विविध राजकीय व सामाजीक मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला, अशी माहिती रजत दायमा यांनी दिली. नागनाथ भिमराव जिंकले यांना यापुर्वी हि त्यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. समाज सेवक. तालुका स्तरीय समाज भुषण असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. संतोष बोलचेटवार मनुर सरपंच, विठल आष्टे सगंम सरपंच बामणी सरपंच शेषेराव पा.साखरे विळेगाव सरपंच उमाकांत पा.शिवशेटे .संघाचे अध्यक्ष जि.पी. मिसाळे, जेष्ठ पत्रकार सजंय कदम, पत्रकार संघाचे अध्यक्ष गंगाधर धडेकर, पत्रकार माधव हानमंते, सुरेश घाळे. सुदर्शन वाघमारे. सिंहनाद युवक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनुपकुमार कासलीवाल.माजी नगर सेवक गंगाधर जारीकोटे.पोतन्ना लखमावाड, लक्ष्मन पाटील येताळे, पोलीस युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष हनुमंत पाटील नरवाडे वर्णीनागभूषण निलेश पाटील बाळापूरकर बंडू पाटील नरवाडे गोविंद पाटील रोशन गावकर गोविंद पाटील सोनटक्के मारुती डेबेकर बिराप्पा मदनकर हिंदु युवा संघटनाचे. अध्यक्ष सतिश मोटकुल, मोहन निरगटले, बाबु जिंकले एकनाथ जिंकले यांनी दिल्या.



# बिबट्याचा शेतकऱ्यावर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** तालुक्यातील धोबीवराड या गावात बिबट्याने बुधवारी रात्री शेतात बांधलेल्या गाईचा फडशा पाडल्यानंतर गुरुवारी सकाळी दहाच्या सुमारास शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यावर हल्ला केला. यात शेतकरी गंभीर जखमी झाला आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनेची माहिती जाणून घेतली. आशिष सुरळकर ( वय 40, रा. धोबीवराड, ता. जळगाव ) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. सध्या खरीप हंगामासाठी शेतीकामांना शेतकऱ्यांनी वेग दिला आहे. दुपारी उन्हाचा कडाका असल्यामुळे सकाळपासूनच शेतीकामे केली जात आहेत. ती दुपारी बारापर्यंत आटोपत पुन्हा सायंकाळी कामे सुरू केली जातात. रोजप्रमाणे गुरुवारी सकाळी आशिष सुरळकर हे शेतात कामासाठी गेले होते. तेथून घरी पततत असताना बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. मात्र, सावध होत सुरळकर यांनी बिबट्याशी झुंज दिली. बिबट्याला त्यांनी पूर्ण ताकदीने बाजूला फेकले. त्यांच्या चेहऱ्यावर डाव्या बाजूला बिबट्याने पंजाने वार केला.

# शेतकऱ्याची गळफास लावून आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** ( ता.फुलंब्री ) येथील युवा शेतकरी सोमिनाथ विष्णू बोकील वय-30 वर्षे यांनी रात्रीच्या सुमारास राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घट्ना ( दि.17 ) रोजी घडली. सदर शेतकऱ्याचा पीरबावडा बस स्टॅन्ड वर दुचाकी दुरुस्तीचा व्यवसाय होता. कोरोना काळात व्यवसायावर परिणाम झाल्याने व्यवसाय ठप्प झाला होता.व त्याने व्यवसाय बंद करुन पुन्हा शेती काम चालू केली होती.घरात वडील व पत्नी प्रतीक्षा यांच्याबरोबर सोमिनाथ राहात होते. सोमिनाथ व भाऊ गजानन यांच्या नावे सामायिक तीन एकर जमीन असून त्यासाठी वडिलांनी काढलेले महाराष्ट्र बँकेचे 1 एक लाख चाळीस हजार रुपये कर्ज दोन वर्षापासून थकित होते. तसेच सेवा संस्थेचे सोमिनाथच्या नावे 31 हजार रुपये व खाजगी पतसंस्थेचे चार लाख कर्ज आहे. याचा सोमिनाथने मानसिक धक्का घेतलेला होता. या घटनेची वड़ोद बाजार पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली असून पुढील तपास बीट जमादार दत्ता मोरे करीत आहेत.





# सोनिया गांधींची शिष्टाई

आधुनिक केसरी

कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदी सिद्धरामय्या विराजमान होणार आहेत तर डीके शिवकुमार हे उपमुख्यमंत्री होणार आहेत यावर आत्ता शिक्कामोर्तब झालं आहे. मात्र कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदाचा पेच सोडवणं काँग्रेससाठी सोपं नव्हतं. सिद्धरामय्या आणि डीके शिवकुमार यांच्यात मुख्यमंत्रीपदासाठी रस्सीखेच सुरु होती. माझ्यासोबत १३६ आमदार आहेत असं डीके शिवकुमार यांनी ठणकावून सांगितलं होतं. तसंच राहुल गांधींना भेटल्यानंतरही ते उपमुख्यमंत्री व्हायला तयार नव्हते असंही सांगितलं जातं आहे. अशात सोनिया गांधींनी शिष्टाई केली आणि डीके शिवकुमार यांनी उपमुख्यमंत्रीपद घेण्यास सहमती दर्शवली. कर्नाटकचे मुख्यमंत्री नेमके कोण होणार यावर तीन दिवस बराच खल चालला. चर्चांच्या अनेक फेऱ्या झाल्या. मात्र सिद्धरामय्या की डीके शिवकुमार कुणाचं नाव फायनल करायचं? यावर एकमत होत नव्हतं. शेवटी काँग्रेस हायकमांड सोनिया गांधी यांनी एक फोन फिरवून डीके शिवकुमार यांच्याशी चर्चा केली आणि निर्णय झाला. सोनिया गांधी यांच्याशी चर्चा झाल्यानंतर डीके शिवकुमार कर्नाटकचे उपमुख्यमंत्री होण्यास तयार झाले. काँग्रेस सूत्रांच्या हवाल्याने एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे. डीके शिवकुमार मुख्यमंत्रीपद हवं म्हणून अडून बसले होते. डीके शिवकुमार हे मुख्यमंत्रीपदावर अडून बसले होते. सिद्धरामय्या आणि डीके शिवकुमार या दोन्ही नेत्यांनी बुधवारी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंची भेट घेतली. तसंच राहुल गांधी आणि के.सी वेणुगोपाल यांचीही या दोन्ही नेत्यांनी भेट घेतली होती. आपली बाजू या दोन्ही नेत्यांनी आपल्या परिने मांडली होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सोनिया गांधी यांनी बुधवारी रात्री उशिरा डीके शिवकुमार यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर ते उपमुख्यमंत्री होण्यासाठी तयार झाले. आता शनिवारी सिद्धरामय्या आणि डीके शिवकुमार यांचा शपथविधी होणार आहे. डीके शिवकुमार यांनी मागच्या चार वर्षांपासून कर्नाटकात जी कामं केली त्याचा हवाला देत मुख्यमंत्रीपद मलाच हवं हे सांगत होते. मात्र शिवकुमार यांनी हेदेखील स्पष्ट केलं होतं की आपण पक्षाला ब्लॅकमेल करणार नाही. काँग्रेसच्या हायकमांड सोनिया गांधी यांनी माझ्यावर कर्नाटक जिंकून आणा अशी जबाबदारी टाकली होती. ती पण मी पूर्ण केली आहे असंही शिवकुमार यांचं म्हणणं होतं. मात्र सोनिया गांधी यांचा एक फोन आला आणि शिवकुमार हे उपमुख्यमंत्री व्हायला तयार झाले.

# आपण सुशिक्षित आहोत का ?



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**लेखाचे शीर्षक असलेला प्रश्न स्वतःच स्वतःला विचारायला हवा. सुशिक्षित म्हणजे नेमके काय हे आधी समजून घ्यायला हवे. फक्त शालेय शिक्षण झालेल्या व्यक्ती पेक्षा विद्यापीठाच्या एकदोन पदव्या घेतलेली व्यक्ती अधिक सुशिक्षित समजायची का? प्रथम श्रेणीत ला विद्यार्थी द्वितीय श्रेणी प्राप्त विद्यार्थ्यांपेक्षा जास्त हुशार समजायचे का?असे काही नसते हे आपल्याला अनुभवाने माहिती आहे. आपण एकीकडे भ्रष्टाचारावर टीका करतो.असे काही करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना,शासकीय अधिकाऱ्यांना नावे ठेवतो.पण या व्यवहारात कुठे ना कुठे, कधी ना कधी आपलाही हातभार असतोच आपले , समाजाचे, भले बुरे कशात आहे याची जाण आपल्याला आहे का?**

आपल्याला कशाने आनंद मिळतो,काय केल्याने समाधान मिळते, हा सारासार विचार आपल्याला करता येतो का ?हा विवेक आपल्यात आहे का ?प्रत्यक्षात तसे दिसत नाही.

.मुलांना प्रवेशासाठी द्यावी लागणारी क्यापिटेशन फी,डोनेशन हा सरळ मार्ग नाही. नोकरी साठी, बढती साठी शिफारसी चे प्रयत्न,याला भ्रष्टाचारा शिवाय दुसरे गोंडस नाव नाही.एखाद्या गोष्टीला विलंब लागत असेल अन् आपल्याला पटकन रिझल्ट हवा असेल तर उघडपणे मोजले जाणारे जास्तीचे दाम ही भ्रष्टाचार आहे. अगदी देवाच्या दर्शनाला ज्यादा पैसे मोजून वेगळ्या रांगेतून पटकन दर्शन घेणे हाही वां मार्गच आहे.शिक्षण हे सारे शिकवते का ?मुळीच नाही! मग आपण सुशिक्षित कसे ?

आजकाल आपण लाखो करोडो च्या आपणच निवडून दिलेल्या लोक प्रतिनिधीच्या सुरस कथा वाचतो. चार पाच वर्षांत कुणाची संपत्ती किती पटीने वाढली, किती करोडची वृध्धी झाली हेही उघड्या डोळ्यांनी बघतो. पण अशाच व्यक्तींना पुन्हा पुन्हा निवडूनही देतो ? हे शहाणपणाचे, सुशिक्षिताचे लक्षण आहे का ? भ्रष्ट, कपटी, कारस्थानी, गुंड प्रवृत्तीच्या पुढाऱ्यामागे जास्त गर्दी असते लोकाची! ही मंडळी दिलेली आश्वासने पूर्ण करणार नाहीत,आपलीच खळगी भरण्यासाठी वाट्टेल ते उद्योग करतील हे माहिती असूनही अनेक तरुण, तरुणी, मोठ मोठी मंडळी यांचे अक्षरशः तळवे चाटतात, त्यांचे पोवाडे गातात याला सुशिक्षित माणसाचा शहाणपणा म्हणायचे का ? खरे तर जागरूक मतदार या नात्याने कुणाला संसदेत, विधानसभेत पाठवायचे हे अधिकार संविधानाने आपल्याला दिले आहेत. किती जण याचा योग्य वापर करतात ? आपणही खोट्या आश्वासनांना, वाटलेल्या खिरापतीला बळीपडतो.गर्दी बरोबर वाहवत जातो. आपण पदव्या घेऊनही अशिक्षितासारखे वागतो.

घरा घरात लहान मोठ्या कारणाने भांडणारे देखील सुशिक्षित असतात.आधी प्रेम करून लग्न केलेले, दोन मुलांचे आई बाप जेव्हा कचा कचा भांडतात, अगदी घटस्फोटाचा टोकाचा निर्णय घेतात, आपल्याच पोटच्या पोरांवर अन्याय करतात, फक्त आपलाच स्वार्थी विचार करतात, तेव्हा तेही आपण दोन तीन पदव्या घेतल्या हे विसरतात. आपले शिक्षणच नव्हे तर सो कॉल्ड संस्कार, नीती धर्म,कर्तव्य, सारे सारे विसरतात. नवऱ्याला अंधारात ठेऊन दुसऱ्या बरोबर संग करणारी, घरून पळून जाणारी सो कॉल्ड पतिव्रता देखील शिकलेली असते. बायकोचा छळ करणारे, तिला मानसिक त्रास देणारे महाभाग नवरे देखील चांगले शिकलेले असतात! आपल्या पार्टनर विरोधात आपल्याच मुलांना भडकावणारे, आगीत तेल ओतणारे आई वडील सुद्धा सुशिक्षित असतात.तरीही हे सारे असे विचित्रासारखे का वागतात ?

बुवाबाजी, अंधश्रध्दा,या नादी लागलेले धर्मांध अशिक्षित नसतात. आपण जे काही करतो ते विवेकाच्या कसोटीवर उतरणारे नाही हे माहिती असूनही अनेक मंडळी त्याच त्या चुका करतात. एकीकडे विज्ञान तंत्रज्ञान शिकायचे अन् दुसरीकडे बुवा महाराजांच्या नादी लागायचे ही समाजाची विकृती हास्यास्पद वाटते. पण हे सर्रास चालते. त्यांना नावे ठेवणारे मूर्ख ठरतात.नास्तिक म्हणून हिणवले जातात. शाळा कॉलेजात हे थोडीच शिकवतात ? मग शिक्षणाच्या,ज्ञानाच्या विरोधात छेद देणारे हे अविचार येतात कुठून ? परस्परातील दूजाभाव,द्वेष,तिरस्कार निपजतो, अंकुरतो कुठून ?

आपल्याला प्रगत व्हायचे आहे. जागतिक स्पर्धेत उतरायचे आहे.विश्व गुरू व्हायचे आहे. कुणाशी स्पर्धा आहे ? आपापसात युद्ध करणाऱ्या देशांशी ? जिथे हिंसाचार आहे, नशा, दारू च्या विळख्यात बेधुंद झालेली तरुण पिढी आहे, जिथे मानसिक अशांती आहे, तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन पस्तावलेल्या,अज्ञात भविष्याच्या अंधारकोठडीकडे वाटचाल करणाऱ्या



देशांशी स्पर्धा करायची आहे ? विश्व गुरू होऊन कुणाला शिकवायचे आहे ?ज्यांच्या हातात बंदुका आहेत, बॉम्ब आहेत,जे स्वतःच अस्वस्थ, अशांत,भरकटलेले आहेत, युध्दात होरपळलेले आहेत, जे कुणाचे काही ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नाहीत, त्यांना विश्वगुरू होऊन शिकवायचे आहे ? जे अशक्य आहे त्याच्या नादी लागून जे शक्य आहे त्याकडे पाठ फिरवणे याला शहाणपण म्हणत नाहीत! हे सुशिक्षिताचे लक्षण नव्हे!

सुरुवात स्वतःपासून, आपल्या घरापासूनच करायची असते. आधी आपणच नेमके शिक्षण म्हणजे काय, ज्ञान म्हणजे नक्की काय, पदवीचा नेमका उपयोग काय, बुध्दीचा वापर कसा करायचा, विवेकाचा वापर कसा करायचा हे सारे शिकायला हवे. आपले विचार,आचार, आपले वागणे आधी चांगले हवे.प्रत्येक अँक्शन का रिऍक्शनदिलीच पाहिजे असे नाही.अरेला तुरे केलेच पाहिजे असे नाही. आर्ट ऑफ लिसनिंग महत्वाचे आहे. पेशंस महत्वाचे आहे. सर्वांगाने विचार करणे मागचा पुढचा विचार करणे महत्वाचे आहे. त्यातही पुढचा,भविष्याचा विचारजास्त महत्वाचा. आपल्या पेक्षा आपल्यावर अवलंबून असणाऱ्याचा विचार जास्त महत्वाचा. संकुचित वृत्ती नको.विश्वची माझे घर वगैरे न झेपणारी लांब उडी देखील नको. आपली क्षमता, आपली झेप आपणच ठरवायची.

शेतकी विज्ञान किंवा पर्यावरण शास्त्र न शिकलेल्या शेतकऱ्याला शेतीचे,हवामानाचे ज्ञान जास्त असते. घरची वडीलधारी माणसे घरचे तंटे, विवाद, निष्णात वकीला पेक्षा जास्त हुशारीने, कमी वेळात सोडवू शकतील. नवरा बायकोचे मतभेद ती दोघेच शांतपणे बसून,विचार करून सोडवू शकतात. त्यांना बाहेरच्या मध्यस्थी ची गरज नाही.कुठल्याही डॉक्टरेट ची तर नाहीच नाही!

हा लेख लिहित असतानाच व्हॉट्स अॅपवर एक मेसेज आला.मन सुन्न,बधीर करणारा. एका वृद्ध,प्रख्यात बालरोग तज्ञ डॉक्टरांचे लातूर जिल्ह्यात, वृद्धाश्रमात एकाकी निधन झाले!त्याचा मुलगा,एम डी डॉक्टर, मुलगी डॉकटर..जावई,सून देखील डॉकटर. पण सारे अमेरिकेत! पैशाच्या खाणीत खोल खोल रुतलेले. काही वर्षांपूर्वी त्यांची आई गेली,तेव्हाही कुणी आले नाही. अन् आता वृद्ध एकाकी पित्याच्या अंत्य संस्काराला देखील कुणी आले नाही. वृद्धाश्रमातील लोकांनीच सारे केले डॉक्टरांचे.. पुन्हा शेवटी येरे माझ्या मागल्या..तोच अनुत्तरीत प्रश्न. खरेच आपण सुशिक्षित आहोत का ? स्वतःच स्वतःला विचारायला हवे!

# पाण्याची बचत : काळाची गरज



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**राज्यातील तापमानाचा पारा जसा वाढत चालला आहे तसा राज्यातील पाण्याचा साठाही आटत चालला आहे. गेल्या काही दिवसात राज्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी तर सोडाच पिण्यासाठीही पाणी मिळणे कठीण झाले आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळाच्या झळा जास्त जाणवत आहे. मराठवाड्यात अनेक मोठ्या प्रकल्पात पाणी साठा संपत आला आहे. राज्यातील धरण साठ्यातही सरासरी तीस ते चाळीस टक्केच पाणी शिल्लक आहे. फेब्रुवारीमध्ये राज्यातील पाणी साठा ६९ टक्के इतका होता तो आज ३५.२७ टक्क्यांवर आला आहे. राज्यभरातील धरणामधला सुमारे ३४ टक्के उपयुक्त साठा कमी झाला आहे त्यामुळे राज्यातील काही शहरांत तर दहा दिवसांतून एकदा पाणी सुटत आहे.**

अनेक गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे काही गावात पंधरा दिवसातून एकदा टँकर येतो तर काही गावात महिन्यातून एकदा टँकर येतो. पाण्यासाठी दाही दिशा अशी लोकांची अवस्था झाली आहे. पाणी मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. राज्यातील अनेक तालुक्यात पाण्याची पातळी खालावली आहे. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. पाण्यासाठी नागरिकांवर दाही दिशा फिरण्याची वेळ आली आहे. मुकी जनावरे आणि पक्षांना देखील पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने आणि स्कायमेटने वर्तवला असल्याने पाण्याचे मोठे संकट उभे राहू शकते. शिवाय यावर्षी पावसाचे आगमन उशिरा होऊ शकते असाही अंदाज वर्तवण्यात आला आहे त्यामुळे दुष्काळाचे संकट आणखी गडद होऊ शकते. हे संकट टाळायचे असेल तर आतापासूनच पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे. उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन त्याच्या वाटपाचे नियोजन केले पाहिजे. पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात आजही २४ तास पाणी पुरवठा केला जातो. २४ तास पाण्याची चंगळ असल्याने कदाचित त्यांना पाण्याचे महत्व माहीत नसेल. पुण्या - मुंबई सारख्या शहरातील काही बेजबाबदार घटक पुरेसे पाणी मिळाल्यानंतर पाण्याची नासाडी करताना दिसतात. नळ खुले सोडून पाणी वाया घालवीत असतात. या शहरातील अनेक ठिकाणी पाण्याची नासाडी होताना दिसते. त्यामुळे या भागातही आवशक्य तितकेच पाणी सोडायला हवे. पुणे महानगरपालिकेने आठवड्यातून एक दिवस पाणी कपात करण्याचा निर्णय घेतला आहे तो स्वागतार्ह आहे त्यामुळे पुणेकरांना पाणी बचतीची सवय लागेल. मुंबई महानगरपालिकेनेही असा निर्णय घ्यायला हवा. लोकांनी पाणी जपून वापरायला हवे. भविष्यातील पाण्याचे संकट गांभीर्याने घेऊन पाण्याचा अपव्यय टाळला आणि काटकसरीने वापर केला तर पाऊस पडेपर्यंत वेळ निभावून नेता येईल. पाणी हेच जीवन आहे. थेंब न थेंब पाण्याची बचत केली पाहिजे. पाण्याची बचत करूनच आपण पाण्याची निर्मिती करू शकतो. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सिमेंट रस्त्यासाठी वापरली जाते चोरीची वाळू

## वडोद बाजार येथील जुन्या पोलीस ठाण्यासमोर साठवली जाते चोरटी वाळू

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश दणके**

**वडोदबाजार :** येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सिमेंट रस्त्याच्या कामासाठी विनापरवाना वाळूचा साठा करून वाळू वापरले जात आहे यामुळे शासनाच्या लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. गिरजा नदीच्या पात्रातून वाळूची चोरटी अवैध वाहतूक जोरात सुरू रात्रभर गिरजा नदीच्या पात्रातून वाळूची चोरटे वाहतूक सुरू असते वाळूची तस्करी करणाऱ्यांचे मोठे रॅकेट असून रात्रीच्या वेळी त्यांचे खबरे गस्तीला असतात या वाळूच्या तस्करी वरती आळा घालने महसूल विभागापुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार परिसरातील गिरजा नदीच्या पात्रातून वाळूची दररोज रात्री मोठ्या प्रमाणात शेकडो ट्रॅक्टरने वाहतूक केली जात आहे मात्र या वाळूच्या वाहतुकीकडे महसूल विभागांचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे दररोज रात्री नऊ वाजेपासून सकाळी सात वाजेपर्यंत बिनधास्तपणे ट्रॅक्टर द्वारे वाळूची चोरटी वाहतूक सुरू असते परिसरात वाळू तस्करांनी हौदोस घातला असून मोठ्या





प्रमाणात वाळूची चोरटी वाहतूक होत असल्यामुळे शासनाच्या लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे तर वडोद बाजार येथे सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत सिमेंट रस्त्याचे काम सुरू असून या शासकीय रस्त्याच्या कामासाठी लागणाऱ्या वाळूची ठेकेदाराने रॉयल्टी काढणे आवश्यक असतानाही ठेकेदार गिरजा नदीच्या पात्रातून अवैध वाळू चा वापर करतांना दिसत आहे तर चोरटी वाळू , विनापरवाना वाळू जमा करून ती वाळू वडोद बाजार येथील जुन्या पोलीस ठाण्याच्या मैदानावर वाळू साठवली जात आहे ठेकेदाराच्या मनमानी पद्धतीने सुरू असलेल्या या वाळूच्या साठवणुकीकडे महसूल विभाग दुर्लक्ष करत असल्यामुळे शासनाच्या लाखो रुपयाचा महसूल बुडत आहे सिमेंट रस्त्यासाठी ठेकेदाराने वाळूच्या वापरासाठी रॉयल्टी परवाना काढणे आवश्यक असतानाही विना परवानगी अवैध्य वाळू वडोद बाजार येथील जुन्या पोलीस ठाण्यासमोर साठवणूक केले जात आहे बिनधास्तपणे या वाळूच्या चोरटी वाहतूक करून शासकीय रस्त्याच्या कामासाठी वापरले जात असतानाही महसूल विभाग चे याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे वडोदबाजार येथील जुन्या पोलीस ठाण्याच्या इमारतीसमोर वाळूची साठवणूक करण्यासाठी ठेकेदाराला. परवानगी दिली कोणी असा प्रश्न निर्माण झाला आहे रात्र भर वाळू पोलीस ठाण्याच्या इमारती समोर साठवली जाते व सिमेंट रस्त्याच्या कामासाठी वापरली जाते त्यामुळे आंधळ दळतंय आणि कुत्र पीठ खात या म्हणी प्रमाणे प्रत्यय येत आहे. या वाळूच्या साठवणुकी बाबत नागरिकांत प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे शासनाच्या लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी याठिकाणी विना परवाना साठवलेल्या वाळू जप्त करून ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सिमेंट रस्त्याच्या कामासाठी वापरल्य जाणाऱ्या वाळुची परवानगी घेऊनच वाळूचा वापर करण्यात यावा अशी मागणी काही नागरिकांनी केली आहे.

## शिर्डी येथे होणाऱ्या राज्यव्यापी भव्य अधिवेशनाच्या अनुषंगाने खुलताबादेत बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शिर्डी येथे होणाऱ्या राज्यव्यापी भव्य अधिवेशनाच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या बैठकीला प्रमुख पाहुणे जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण इंगळे, मराठवाडा महासचिव अरविंद अवसरमोल, जिल्हा सरचिटणीस प्रवीण नितनवरे, जिल्हा उपाध्यक्ष रमेश दाभाडे, , पश्चिम आध्यक्ष किशोर साळवे , शहर उपाध्यक्ष दिलीप बोर्डे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन करून तालुक्यामधून किमान 500 कार्यकर्ते होणाऱ्या भव्य अधिवेशनास उपस्थित राहण्याचे सुचित करण्यात आले. व सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने तालुका अध्यक्ष फकीरराव भालेराव यांनी तालुक्यातून जास्तीत जास्त कार्यकर्ते कार्यक्रमासाठी आणण्याचे आश्वासन दिले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर खरात, तालुकाध्यक्ष फकीरराव भालेराव, तालुका सचिव संजय जाधव, तालुका संघटक भास्कर खाजेकर, महिला तालुकाध्यक्ष राधाताई शिंदे, महिला तालुका उपाध्यक्ष निर्मलाताई शेवारे, महिला तालुका सचिव सायरा बी शेख, तालुका सल्लागार अर्जुन भालेराव, वेरूळ सर्कल प्रमुख गुलाब सातदिवे, गदाना सर्कल प्रमुख भाऊसाहेब बनकर, बोरगाव सर्कल प्रमुख वाल्मीक ढिवर, शहराध्यक्ष अण्णा जाधव, शहर उपाध्यक्ष मिलिंद जाधव, शहर सचिव विकास बनकर, ज्येष्ठ नेते अशोक पवार, युवा कार्यकर्ते शंकर भांडे, रफिक पठाण, नाना बनकर, आजिनाथ दांगोडे, हरी दांगोडे, रमेश ठाकरे, अमोल बनकर, किसन सौदागर, नंदू सौदागर, सिताराम शेवारे, अशोक शिरसाट, दामू सातदिवे, बंडू साळवे, योगेश जाधव, अमोल खरात, साईनाथ डोळे, आया सौदागर. आदि कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जि.प.चे विद्यार्थी निघाले इस्त्रो दौऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने घेतलेल्या जिल्हास्तरीय विज्ञान सामान्य ज्ञान स्पर्धेत निवड झालेल्या खुलताबाद तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता आठवी वर्गात शिक्षण घेणाऱ्या तीन विद्यार्थिनीची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे यामध्ये बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद शाळेतील साक्षी शांताराम पुंड व धनश्री सुनील बर्वे ईश्वरी राजेंद्र आघाडे या दोघी धामणगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या विद्यार्थिनीचा समावेश आहे विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांच्या सूचनेनुसार व संकल्पनेतून या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे हे विद्यार्थी 15 ते 20 हे पाच दिवसाच्या दौऱ्यासाठी विमानाने पुणे येथून बगरूळ त्रिवेदम जात आहे इस्त्रो बंगरुळ दौऱ्या दरम्यान तारांगण म्युझियम यासह शैक्षणिक व पर्यटन स्थळांना भेटी देणार आहेत या विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी विलास केवट मुख्याध्यापक शिक्षक पालक आदींनी अभिनंदन केले आहे.



## रेती तस्करीला प्रतिबंधासाठी तहसीलदारांचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** अवैध रेती तस्करीला प्रतिबंध लावण्यासाठी महसूल विभागाने कंबर कसली असून कडक उपाय योजनांमुळे या गोरखधंद्याला चाप बसला आहे. याचाच एक भाग म्हणून विशिष्ट वाहनांना इंधन विक्री न करण्याचे व थारा न देण्याचे आदेश देऊळगाव राजा तहसिलदारांनी काढले आहे. प्रभारी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सुस्तावलेल्या यंत्रणांना अवैध रेती उत्खणन व वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी कामाला लावले आहे. देऊळगाव राजा तालुका रेती तस्करीचे मोठे केंद्र आहे. तालुक्यातील डिग्रस, देऊळगाव मही, नारायणखेड, निमगाव गुरु परिसर तस्करांचे कार्यक्षेत्र आहे. दरम्यान, अवैध वाहतुकीसाठी विनाक्रमांकाच्या वाहनांचा वापर तस्कराकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र Business Katta












# बहोत हो चुकी अब महंगाई की मार ...



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय सहन करणारे जास्त दोषी असतात. मी याच गोष्टीचा जाणून-बुजून उल्लेख करत आहे. कारण व्यक्ती असो अथवा समाज अथवा राजकारणातील सत्ताधारी यांनी नेहमीच जनतेच्या हित व कल्याणासाठीच कार्यरत असावे असे सर्वमान्य आहे व हे वास्तवही आहे. म्हणजेच राज्यकर्त्यांची वागणुकीची दिशा ही सर्वांसाठी हितावह असली पाहिजे. हितावह म्हणजेच सर्वसामान्य जनतेला अन्न, वस्त्र व निवारा या तीन गोष्टी माफक दरात कायमस्वरूपी मिळाल्या पाहिजेत.**

ही व्यवस्था सुलभ राहून किमान अंशी दैनंदिन जीवन सुखकर व्हावे एवढेच जनसामान्यांना अपेक्षित असते व हे ही जर सुलभरित्या मिळत नसेल तर शासन कर्ते कुणीही असोत जनता त्यांच्यावर कायम नाराज असते. प्राप्त परिस्थितीनुरूप सर्वांनीच सुधारणावादी राहिले पाहिजे पण पोटाची खळगीच जर भरत नसेल तर जनतेने सुधारणावादाचा स्वीकार का बरे करावा? सुधारणेच्या नावाखाली जर आम जनतेच्या खिशाला कात्री लागत असेल व कात्री लागूनही पुरेशा सोयी सुविधा माफक दरात मिळत नसतील तर अशा सुधारणावादाचा कोण बरे स्वीकार करेल ? नेमकी आपल्या देशात अशीच परिस्थिती मागच्या दहा वर्षापासून आपण सर्वजण प्रत्यक्ष अनुभवत आहोत. वर्तमानातील शासनकर्ते सुधारवादाच्या नावाखाली जनतेची उपेक्षाच करत असल्याचे सर्वसामान्य प्रखरतेने अनुभवत आहेत. पुढच्या दाराने सवलती देऊन जनतेला विकासाचे गाजर दाखवायचे अन दैनंदिन गरजेच्या वस्तूंची भरमसाठ भाववाढ करून मागच्या दाराने सर्व काही काढून घेऊन जनतेला नागवे करायचे असा विकास जनतेला अपेक्षित नसतो. सर्वसामान्यांसह मध्यमवर्गीयांची एवढीच एक माफक अपेक्षा असते ती म्हणजे जगण्यासाठी लागणाऱ्या दैनंदिन वस्तू ह्या महागाईच्या झळा न बसता त्या कमीत कमी दराने मिळाल्या पाहिजेत. ज्यासाठी शासनकर्त्यांनी त्या नेहमीच नियंत्रित ठेवल्या पाहिजेत. आज विकासाच्या नावाखाली सर्वसामान्य व मध्यमवर्गीयांची आर्थिक लूट करून दैनंदिन जीवनातील गरजेच्या वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. सत्तेत येण्यापूर्वी वेगवेगळी आमिषे दाखवून सत्ता हस्तगत करायची आणि नंतर विकासाच्या नावाखाली जनतेचे खिसे रिकामे करायचे. विकास तर झाला पाहिजे पण जनसामान्यांना महागाईच्या कात्रीत पकडून नव्हे ?आज प्रत्येक जीवनावश्यक वस्तूचे दर गगनाला भिडले आहेत. दोन तीनशे रुपयांचे गॅस सिलेंडर बाराशे वर गेले, विद्युत बिलापोटी मध्यमवर्गीयांची कंबर मोडली, तेल दीडशे, दूध सत्तर, पेट्रोल एकशे बारा , वैद्यकीय खर्च तर कुठल्या कुठे, इतरही दैनंदिन जीवनावश्यक लागणाऱ्या प्रत्येक वस्तूतील किमतीने मागील सर्व उच्चांक मोडले असल्यामुळे सर्वसामान्य पूर्णतः नागवला आहे. इकडे शेतमालाला हमीभाव नाही त्यामुळे शेतकरी हवालदिल आहे, तिकडे कष्टकरी कामगार वर्ग आपली कशीबशी तडजोड करून मेटाकुटीला आला आहे. सर्वत्र महागाई वाढीमुळे प्रत्येकजण शासन कर्त्यांवर नाराज आहेत. इकडे आड तिकडे विहीर अशी सर्वसामान्यांची अवस्था झाली आहे. काळा पैसा, कर बुडवे, भ्रष्टाचारावर शासनकर्त्यासह प्रशासनकर्त्याचेही कुठलेच कठोर नियंत्रण नाही. सवलतीच्या नावाखाली धन्याला धतुरा आणि चोराला मलिदा अशीच सर्वत्र अवस्था होऊन बसली आहे, राजकीय पुढारी व धनदांडगे मात्र मजेत आहेत." कदूए डूब रहे है और पत्थर तैर रहे है " असेच वास्तव चित्र आहे. सरकारी आरोग्य सुविधा अपुऱ्या, खाजगी वैद्यकीय सुविधा म्हणजे शेतकऱ्यांचे बैल खाटकाच्या दावणीला , औषधाच्या भरमसाठ वाढलेल्या किमती , खाजगी आरोग्यसेवेची मक्तेदारी,शिक्षण क्षेत्रात तर डकैतोंकी टोली असेच म्हणावे लागेल.समसमान न्यायाला हरताळ फासून भांडवलदारांचे चांगभले , बेरोजगारांचे थवेच्या थवे, सरकारी सेवा योजना बंद करून सर्वकाही खाजगीकरणाच्या माध्यमातून



चोर व कर बुडव्या असणाऱ्या उद्योगापतीकडे वळते केल्यामुळे सर्वसामान्य व माध्यम वर्गीयांनी जगावे का मरावे अशीच सर्वत्र अवस्था निर्माण झालेली आहे. मागच्या तीन दशकांपूर्वी काही अन्याय झाला व महागाई वाढली की जनता स्वतः रस्त्यावर उतरून सरकारला जाब विचारत असे.आज बऱ्याच अंशी लोकांची मानसिक निष्क्रियता वाढल्यामुळे जनता ही पूर्वीप्रमाणे रस्त्यावर उतरून शासनकर्त्यांना जाब विचारण्यास असमर्थ ठरल्यासारखी आहे. प्रत्येक जण जात-पात व धर्मांधतेमुळे मूळ प्रश्नांकडे लक्ष न देता आप आपल्या स्वार्थात गुंतलेली आहे. त्यामुळे सरकारलाही वाटते महागाई वाढलेलीच नाही म्हणून सरकारही अशा प्रश्नाला दुर्लक्षित करून विकासाची स्वप्न दाखवून झुलवत ठेवत आहे. जात-पात आणि धर्माच्या नावाखाली मंदिरे बांधून ठराविक जातीच्या लोकांना हिंदुत्ववादाचा मुलामा चढविला जातो. भारतीय संस्कृती ही मुळातच जात व धर्माधिष्ठित असल्यामुळे जनतेलाही त्यातच गोडवा निर्माण करून आपापली वोट बँक सुरक्षित ठेवण्याचा सर्रास प्रयत्न चालू आहे. धर्मरक्षण जरूर करा पण धर्माच्या नावावर जनतेला उल्लू बनविण्या ऐवजी वाढत्या महागाईचा आगडोंब कमी करून संरक्षण दिल्यास हीच जनता शासनकर्त्याला डोक्यावर घेऊन नेहमीच नाचेल अन्यथा २०२४ ला देशात सर्वत्र कर्नाटक झाल्याशिवाय राहणार नाही. सुदैवाने आज भारतातील बोटावर मोजण्या इतक्या राज्य व केंद्रशासित प्रदेशात भाजपची सत्ता आहे. जनसामान्य २०१४ पूर्वी असेच काँग्रेसच्या राजवटी व घराणे शाहीला कंटाळल्यामुळे देशासह काही राज्यात भाजप ला सत्तेत बसविले. सुरुवातीचे पाच वर्षे काँग्रेसवाल्यांनी सत्तेत राहून केलेली घाण साफ सुफ करण्यात गेली, परत २०१९ ला पुन्हा जनतेने आवडीने भाजप ला डोक्यावर घेतले,आता परत २०२४ ला ही हिंदुत्वाच्या नावाखाली भाजप ला सत्तेत घेतील पण महागाई,बेरोजगारी, भ्रष्टाचार, शेतकरी कष्टकऱ्यांना योग्य न्याय, शेतमालाला हमीभाव, शिक्षणाचे बाजारीकरणासह जनतेला दैनंदिन लागणाऱ्या मूलभूत सोयी सुविधा अल्प व माफक दराने पुरवून मध्यमवर्गीयांसह सर्वसामान्यांना सुखी ठेवल्यास ?अन्यथा जनता २०२४ ला पुन्हा पर्याय शोधण्याचा नक्कीच प्रयत्न करेल. करिता वर्तमानातील सत्ताधार्यांनी जनभावनेचा उद्रेक होण्याआधी सर्वकाही सुरळीत करून सामान्यांना सहजपणे जगता यावे अशी व्यवस्था करावी. वर्तमानातील विरोधक तुमच्या आधीच उण्यावर आहेत, त्यांनी भूतकाळात काय दिवे लावले हे आम जनतेला माहित आहे, पण इतर पर्याय उपलब्ध करून घेण्यासाठी भविष्यात आघाड्या निर्माण करून सत्ता हस्तगततेचा प्रयत्न जोमाने वाढेल.म्हणून वर्तमानातील सरकारने महागाई कमी करून जनतेचा आदर करावा. देशाला महासत्ता जरूर बनवा पण आम जनतेला सुखी करून अन्यथा विकासाच्या नावाखाली उपाशी पोटी ठेवून नव्हे ?ओ शासको, ये तो पब्लिक है सब जानती है... अंदर क्या है, बाहर क्या है सब पेहेचानती है.

# सोशल मीडिया मोक्याचं, सोळावं वरीस धोक्याचं

आधुनिक केसरी

**तारुण्याच्या दिशेने झुकणारं वय म्हणजे सोळावं वर्ष! सोळा ते बावीस-तेवीस वय हे तरुण-तरुणींसाठी मोठ्या धोक्याचंच असतं. या वयात तरुण-तरुणी प्रेम, मैत्री या गोष्टीमध्ये विनाकारण गुरफटून जातात. एका बाजूला अभ्यासाचा ताण व दुसरीकडे 'तो' तिच्या व 'ती' त्याच्या आठवणीत रात्र जागून काढत असते. या वयात जे काही होतं ते तरुण-तरुणींनी अनुकरणातून शिकलेले असतात. कारण त्यांना या गोष्टीचा फारसा अनुभव आलेला नसतो. तारुण्याची पहिली पायरी समजणा-या सोळाव्या वर्षात स्वतःला जेवढे जपावं तेवढे कमी असते. या वयातच तरुण-तरुणी अधिक घसरतात. ज्याला सावरता आले त्याचेच करिअर उज्ज्वल होते. नाही तर 'घडीचे घड्याळ' व्हायला वेळ लागत नाही.**

घाई गडबडीत घेतलेला निर्णय भविष्यात पश्चातापाशिवाय काहीच देत नाही. सोळाव्या वयात 'तो' तिच्या व 'ती' त्याच्याकडे पाहणे स्वाभाविक आहे. परंतु यात स्वतःचा तोल सांभाळणे अधिक महत्त्वाचे असते. स्वप्न पाहण्याचा सगळ्यांना हक्क आहे. मात्र ती स्वप्न पाहण्याचाही एक काळ असतो याचे भान तरुण-तरुणींनी ठेवले पाहिजे. या वयात घेतलेले निर्णय सहसा चुकीच्या मार्गाने जाणारे असतात. त्यामुळे घरच्यांचा विरोध पत्करावा लागतो. एका बाजूला करिअर तर दुस-या बाजूला 'प्रेम' अशी 'द्विधा अवस्था' कमी वयात डोके दुखी होऊन बसते. एका बाजूला 'आड तर दुस-या बाजूला विहीर' अशी अवस्था निर्माण झाल्याने तरुण-तरुणी घरच्यांच्या नकळत अभ्यासाच्या काळात 'प्रेमाचे रंग' उधळत असतात. यातून काही अनैतिक घडल्यास आता पुढे काय? हा प्रश्न तरुण-तरुणींना भंडावून सोडतो. आपलं गुपीत घरच्यांना कळले तर काय होईल? अशा दडपणामुळे तरुण-तरुणींमध्ये वैफल्य निर्माण होते. त्यामुळे समाजात मनोरुग्णांची संख्या सतत वाढत आहे. प्रेम' करणे चुकीची गोष्ट नाही. परंतु स्वतःच्या पायावर उभे राहून केवळ 'प्रेम' करायचे नाही तर ते शेवटपर्यंत निभवायचे असते. कारण प्रेम करणे सोपे आहे, मात्र ते निभावणे कठीण... व्यक्तीला प्रत्येक वयात वेगवेगळे निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे घाईत घेतलेला निर्णय भविष्याची डोके दुखी होता कामा नये. त्यामुळे सोळाव्या वर्षात तोलून मापून पाऊल उचलले पाहिजे. सोळाव्या वर्षी कशाप्रकारे काळजी घ्यायला पाहिजे? सोशल मीडियाच्या चक्रव्युहात गुरफटून न जाता आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करायला पाहिजे. कारण शिक्षणच आयुष्यभर तुमच्या उपयोगी पडेल. लोकांच्या सांगण्यावर जाऊ नये आणि निर्णय घेताना विवेक बुध्दीचा वापर करायला पाहिजे. काहीच सुचत नाही, अशा स्थितीत विश्वसनीय मित्रांचा सल्ला घ्यायला पाहिजे. ना की चुकीच्या मार्गाने लावणा-या मित्रांचा... आपले चुकीच्या दिशेने पडणारे एक पाऊल ही कुटुंबासाठी नुकसानदायी ठरू शकते. तारुण्याच्या उंबरठ्यावर चुकीचा निर्णय किंवा चुकीच्या दिशेने पडणारे पाऊल भविष्य उध्दवस्त करू शकते. आपल्या मनातील गोष्ट आई-वडीलांसोबत शेअर करायला पाहिजे, त्याने तुमचे मन हलके होईल व अभ्यासात मन रमेल.



कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी ७०५७१८५४७९

हार्मोन्स बदलामुळे सोळाव्या वर्षापासून मुलींमध्ये शारीरिक बदल घडायला लागते. या बदलांमुळेच वयात आलेल्या मुली आकर्षित होतात. मग याचा फायदा अनेक जण घ्यायला लागतात. शारीरिक आकर्षणाला प्रेम समजून आपलं सर्वस्व अर्पण करायला मुली तयार होतात. यातूनच 'साथ जिएंगे साथ मरेंगे' या कसमे वादेच्या परिपूर्णतेसाठी ब-याचदा जन्मदात्या आई-वडिलांना कुठलीही भनक न लागू देता मुली घरून बेपत्ता होतात. मुला-मुलींचे बेपत्ता होण्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. नंतर मात्र त्यांची अवस्था 'धोबी का कुत्ता घर का ना घाट का' यासारखी अतिशय बिकट बनते. या गंभीर समस्येवर तोडगा काढण्याची गरज निर्माण झाली आहे. ब-याच कुटुंबात वा समाजात या भीतीतून मुलींचे बालविवाह लावण्याचा प्रकारही सुरु आहे.

जिल्ह्यात दीड वर्षात ३१४ मुली घरून पळून गेल्या. त्यापैकी ७७ मुलींना परत आणण्यात आले. तर १८ वर्षावरील १ हजार ६५ मुली अर्थात महिला पळून गेल्या आहेत. त्यांचाही शोध घेण्यात येत आहेत. एकंदरीत आधुनिक जीवनशैली, मोबाईलचा अतिवापर, सोशल मीडिया यामुळे सहज जवळ येणे शक्य आहे. ही जवळीकताच वयात येणा-या मुलींसाठी धोकादायक ठरत आहे. विवाहबाह्य संबंध असलेल्या काही महिलांनीसुद्धा चक्क आपल्या मुलाबाळांना सोडून आपल्या प्रियकरासोबत पलायन केले आहेत. अशा महिलांमुळे त्यांच्या पतींच्या अडचणी वाढल्या आहेत. पत्नीचा शोध घेऊन तिला परत आणण्याची आर्जव विनवणी महिलांचे पती करत आहेत. सोशल मीडियामुळे जवळीक वाढत आहेत. मोबाईलचा अतिवापर आणि पालकांच्या व्यस्ततेमुळे होत असलेले दुर्लक्ष अनेक प्रकरणात कारणीभूत असल्याचे दिसत आहेत. पालकांनी मुलांवर लक्ष ठेवण्याची गरज आहे, तरच या समस्येवर आळा बसू शकेल. पालकांनी मुलांना समजून घेण्याची गरज आहे. मुलामुलींशी मैत्रीपूर्ण वागून त्यांच्यासोबत नियमित संवाद ठेवणे, चर्चा करणे गरजेचं आहे. यासोबतच मुलांचे मित्र कोण? त्यांचा ग्रुप कोणता? याचीही माहिती ठेवणे अत्यावश्यक आहे. मुलींमध्ये हार्मोन बदलामुळे आकर्षण निर्माण होते. तर ते प्रेम नसून केवळ शारीरिक आकर्षण आहे, याची समज देऊन त्यांना चांगल्याप्रकारे समजावून सांगण्याची नितांत गरज आहे. मोकळीकतेच्या नावाखाली मुलामुलींकडे दुर्लक्ष करू नये.

# कर्नाटक विजयासाठी किंगमेकर ठरले त्रिदेव..!

आधुनिक केसरी

नुकताच सन 2023 मधील 10 मे रोजी झालेली कर्नाटक विधानसभेची पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुक काँग्रेससाठी अत्यंत प्रतिष्ठेची आणि अस्तित्वाची मानली जात होती यामध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष आणि कर्नाटकचे सुपुत्र मल्लिकार्जुन खरगे, माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, प्रदेशाध्यक्ष डि.के.शिवकुमार या त्रिदेवांची रणनिती कर्नाटकात कामी आली असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही कारण योग्य उमेदवार निवड, मिडिया, प्रचार यंत्रणा, राज्यांतील जनतेचे प्रमुख प्रश्न आणि भविष्यातील पक्षाचे संकल्प घेवून संपूर्ण कर्नाटकमध्ये आवाज उठविला तसेच देशाचे नेते राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा, प्रियंका गांधी यांच्या प्रचार सभा याचाच परिपाक म्हणून जनतेने बहुचर्चित कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा निर्विवाद कौल जनतेने काँग्रेसच्या बाजूने दिल्याने कर्नाटकात काँग्रेसने करिश्मा घडवला आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अत्यंत प्रतिष्ठेच्या केलेल्या निवडणुकीत भाजपचा सुपडा साफ झाला आहे सगळेच अंदाज फोल ठरवत भाजपला अपेक्षे इतक्याही जागा मिळवत्या आल्या नाहीत मोदी-शहांचा करिष्मा कर्नाटकात न चालल्यामुळे त्रिशंकु विधानसभेची शक्यता फोल ठरली असून कर्नाटक विधानसभेच्या एकूण २२४ जागेपैकी काँग्रेसला जनतेने १३७ जागेचे स्पष्ट बहुमत दिले हिंदू, मुस्लिम, बजरंगबली, हिजाबसारखे धार्मिक तणावाचे मुद्दे जनतेने पूर्णपणे नाकारल्याचे दिसून आले प्रत्येक वेळी धर्म आणि जात यांचा वापर करण्याचा प्रयत्न केला तर नेहमी यश येत नाही असाच निकालाचा अर्थ आहे

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव





देशातील एकमेव दक्षिणेतील भाजपचा बालेकिल्ला कर्नाटक राज्य घेण्यासाठी किंगमेकर ठरले ते राज्यातील त्रिदेव खर्गे, डि.के. आणि सिद्धरामय्या !!

# मातृहृदयी गुरुवर्य : प्रा. सुरेश पुरी



आधुनिक केसरी

गुरुवर्य प्रा. सुरेश पुरी सर यांचा आज वाढदिवस त्या निमित्ताने सरांबद्दल थोडसं...

आयुष्यामध्ये गुरुच स्थान खुप महत्वाच असत. कारण ते एका जागेवर स्थिर राहून इतरांना यशाच्या शिखरावर पोहचवण्याच कार्य करतात. नेहमी चांगला मार्ग दाखवतात. प्रतेकाच्या मनामध्ये आपल्या गुरुबद्दलची आदराची भावना असते. परंतु सरांबद्दलच आमच नात यापलीकडच आहे. सर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वृत्तपत्र विभागात जनसंपर्क हा विषय शिकवायचे, या विभागात शिक्षणासाठी येणारे बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातीलच असायचे. दर वर्षी सर आधी सर्वांची ओळख करुन घ्यायचे नाव, गाव, आई- वडील काय करतात. शेती किती आहे. इथे कुठे राहतो, हॉस्टेल मिळाल का? प्रत्येकांची सर खुप आत्मियतेने विचारपूस करायचे. इथूनच सरांबदलच एक वेगळ नात प्रतेकांच्या मनात निर्माण व्हायच. सर सर्वाधिक काळ हे विद्यार्थ्यांतच घालवायचे, त्यामुळे एक आपलेपणाची भावणा अधिकच घट बनली ती आज पर्यंत कायम आहे. सर विद्यापीठातील कॉटरलाच राहत. त्यामुळे सरांकडे नेहमी येण-जाण असायच इतकेच नव्हे तर दररोज 10-15 विद्यार्थ्यांच चहा नाष्टा सरांच्या घरीच व्हायच आणि पहिलं लेक्चर पण, परंतु हे लेक्चर थोड वेगळ असायच. प्रत्येकांच्या काळजीच आणि समस्येवर असायच. आम्ही पण सरांसमोर समस्या हकाने मांडायचो मग ती शैक्षणिक असो राहण्याची असो किंवा आर्थिक असो सरांचा मदतीचा हात नेहमीच पुढे असायचा, ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. अश्या विद्यार्थ्याला तर सर दतकच घ्यायचे. कोणाला घरी जाण्यासाठी तर कोणाला दवाखान्यात जाण्यासाठी तर कोणाला नोकरीसाठी सर नेहमी मदत करत. एखादा विध्यार्थी घरी नाही आला तर सर त्याची आवर्जून विचारपुस करत तर कधी वसतीगृहात येवून आम्ही अभ्यास करतो की नाही ते पाहत. इतकेच नव्हे तर काही विद्यार्थ्यांचे लग्न देखील लावून दिले, यात काही आंतरजातीय लग्न लावलेल्या मुलींना घरी येऊदिले नाही अशा मुलीचे बाळतपण देखील आपल्या घरी केले. विद्यार्थ्यांची सर आई-वडीलासारखी काळजी घेत, सरांच घर म्हणजे आमच्यासाठी एक हकाच घर होत. आज सरांचे विद्यार्थ्यी कोणी पत्रकारितेत तर कोणी शासनाच्या माहीती व जनसंपर्क विभागात अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. कोणी प्राध्यापक तर कोणी समाज कार्यात तर कोणी राजकिय क्षेत्रात. सर्व राज्यात व राज्याबाहेर सरांचे विध्यार्थी पसरलेले आहेत. सरांच समाज कार्य पण तितकेच गौरवशाली आहे. आज सरांना जनसंपर्काचे पितामह म्हणून ओळखले जाते. अशा मातृह्रदयी गुरूच्या पाठीशी त्यांचे संपुर्ण कुटुंब होतेच परंतु एक व्यक्ती अशी होती जिच्यामुळे सरांना इतके कार्य करणे शक्य झाले. ती व्यक्ती म्हणजे काकु अर्थात सरांच्या पत्नी, काकुंच स्वभाव अगदी मायाळू व प्रेमळ, त्याही आमची लेकरासारखीच काळजी करत, घरी आलेल्या प्रत्येकांना त्यांनी कधीच उपाशीपोटी जाऊदीले नाही. सरांच्या प्रतेक कार्यात व सुख- दुखात काकुंच मोलाच सहकार्य आहे. 2010 साली सर विभागातून निवृत्त झाल्यावर काही विद्यार्थ्यांनी एकत्र येवून सरांवर "आई मनाचा माणूस" हा ग्रंथ प्रकाशित केला. सर सध्या हैदराबाद हिंदी प्रचार सभेचे मंत्री आहे. आजही सर सगळ्या विद्यार्थ्यांची विचारपूस करतात. अशा आई मनाच्या गुरुला

अंकुश चव्हाण
9689672509

# संघराज्य व त्याचे राज्यक्षेत्र



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268


आधुनिक केसरी

**संविधानाविषयी अत्यावश्यक माहिती जाणून घेतल्यानंतर, आता आपण त्याच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न करणार आहोत. संविधानाच्या अनुच्छेदांना एकेक करून समजून घेऊनच आपण त्याचे अंतरंग जाणू शकतो. आपणास पूर्व कल्पना आहेच की, आपल्या संविधानात '२५ भाग' '१२ अनुसुच्या' आणि '३९५ अनुच्छेद' आहेत. गरजेनुसार वेळोवेळी आपल्या राज्यघटनेत 'घटनादुरुस्त्या' होऊन या अनुच्छेदांची संख्या '४५०' च्याही वर पोहोचलेली आहे. परंतु हे वाढलेले अनुच्छेद '३९५' च्या पुढे न मांडता, आहे त्याच अनुच्छेदांमध्ये 'खंड, उपखंड' म्हणून मांडल्यामुळे आपल्या राज्यघटनेतील अनुच्छेदांची संख्या ही '३९५च' दिसते.**

आजच्या भागात आपण आपल्या भारतीय संघराज्यात 'नवीन राज्ये दाखल' किंवा 'स्थापन' करण्यासंदर्भात असलेले 'अनुच्छेद-२' पाहुया....

अनुच्छेद-२:- नवीन राज्ये दाखल करून घेणे किंवा स्थापन करणे.- संसदेला, तिला योग्य वाटतील अशा अटींवर व शर्तींवर कायद्याद्वारे नवीन राज्ये संघराज्यामध्ये दाखल करुन घेता येतील किंवा स्थापन करता येतील.

अनुच्छेद-२ खंड (क):- [सिक्कीम हे संघराज्याशी सहयोगी करणे] "संविधान (छत्तीसावी सुधारणा) अधिनियम, १९७५ कलम ५ द्वारे निरसित (२६ एप्रिल, १९७५ रोजी व तेव्हापासून). 'अनुच्छेद-२' हा भारतीय राज्यक्षेत्राबाहेर असलेल्या 'इतर राज्यक्षेत्रांना' भारतीय संघराज्यात सहभागी करून घेण्यासंदर्भात आहे. अशा राज्यक्षेत्रांना, संसदेला योग्य वाटतील, अशा 'अटी' आणि 'शर्तींवर' कायद्याद्वारे भारतीय राज्यक्षेत्रात सहभागी करून घेण्याचा अधिकार आहे. असे क्षेत्र भारतात सहभागी करून घेण्यासंदर्भात देखील या अनुच्छेदात दोन महत्त्वाच्या शब्दांचा वापर करण्यात आलेला आहे. एक म्हणजे 'दाखल करून घेणे' व दुसरा 'स्थापन करणे'. 'दाखल करून घेणे' चा अर्थ आहे- 'प्रवेश देणे'. म्हणजेच भारत त्या राज्यक्षेत्रांना सुद्धा आपल्यात सहभागी करून घेऊ शकतो, जे अगोदर पासूनच 'स्वतंत्र राजकीय एकक' म्हणून अस्तित्वात आहे. तसेच 'स्थापन करण्याचा' अर्थ आहे की, असे एखादे राज्यक्षेत्र, की जे अगोदरपासून राजकीय एकक नाही, परंतु सहभागी करून घेतल्यानंतर, त्याला एक नव्या राज्याच्या स्वरूपात स्थापन करणे.




भाग -११

आता असे कोणते राज्यक्षेत्र होते, की जे स्वातंत्र्यानंतर आपल्या भारतात नव्हते आणि नंतर ते भारतात सहभागी करून घेण्यात आले? आपल्या देशावर इंग्रजांप्रमाणेच काही ठिकाणी पोर्तुगीज, फ्रेंच यांचेदेखील राज्य होते. आपण वेगवेगळ्या 'मोहिमा' राबवून ते ते क्षेत्र त्यांच्याकडून 'हस्तगत' करून आपल्या देशात सामील करून घेतलेले आहेत. पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेले 'गोवा, दिव, दमन, नगर हवेली' आदी राज्यक्षेत्रे आपण ताब्यात घेतली. परंतु ह्या राज्यक्षेत्रांना स्वतंत्र राज्याचा दर्जा न देता त्यांना 'केंद्रशासित प्रदेश' म्हणून मान्यता देण्यात आली. म्हणून या क्षेत्रांसाठी 'अनुच्छेद-२' चा वापर न करता, 'अनुच्छेद-३६८' नुसार पहिल्या अनुच्छेदात घटनादुरुस्ती करून ही राज्यक्षेत्रे 'केंद्रशासित' म्हणून घोषित करण्यात आली.

फ्रेंच लोकांचा 'पॉंडिचेरी, माहे, यमन, करिकाल, बंगालमधील चंद्रनगर' आदी क्षेत्रांवर ताबा होता. 'ही' राज्यक्षेत्रे आपण त्यांच्याकडून ताब्यात घेऊन, 'पांडेचरी, यमन, माहे आणि करिकाल यांचा 'एक संयुक्त' 'केंद्रशासित प्रदेश' बनवला. इथे पण 'अनुच्छेद-२' ऐवजी 'अनुच्छेद-३६८'चाच वापर झाला. परंतु 'चंद्रनगर' बंगालच्या जवळ असल्याने '१९५४' मध्ये त्याला 'बंगाल राज्यात' सहभागी करून घेताना सर्वप्रथम 'अनुच्छेद-२' चा वापर करण्यात आला.

'सिक्कीम' हे एक स्वतंत्र असे 'राजेशाही राष्ट्र' होते. भारताप्रमाणेच इथेही इंग्रजांचा अंमल होता. १९४७ मध्ये ब्रिटिश अंमल गेल्यानंतर ओघाओघाने ब्रिटिशांची सिक्कीममधील 'जबाबदारी' भारताने उचलली. १९५० मध्ये भारताबरोबर झालेल्या करारानुसार 'सिक्कीम' हे भारताचे 'रक्षित राज्य' बनले. तेव्हापासून सिक्कीमवरील भारतीय प्रभाव वाढला. भारताने सिक्कीमच्या 'संरक्षण, परराष्ट्रीय धोरण व संदेशवहनाची' जबाबदारी घेतली. सिक्कीमच्या 'आर्थिक व सामाजिक' विकासासाठी भारताने मदत केली.

सिक्कीमच्या जनतेचा सुरवातीपासूनच असलेला 'कौल' लक्षात घेता, भारतीय सैनिकांनी सिक्कीमच्या 'चोग्याल राजाच्या' राजवाड्याला 'वेढा' घातला. भारतीय सैन्याने राजवाड्यात असलेल्या अवघ्या '२४३ सैनिकां'वर सहज ताबा घेतला. त्यानंतर 'सिक्कीम' राज्याला भारतात सहभागी करून घेण्यासंदर्भात तिथल्या जनतेचे 'जनमत' तपासले गेले. तेथील ९७.५% मतदारांनी सिक्कीमचे भारतात विलीनीकरण करण्याच्या बाजूने कौल दिला. परंतु तरीही आपण सिक्कीमला भारतात थेट सामिल करून न घेता 'सहयोगी राज्याचा दर्जा' दिला. पुढे साधारण वर्षभरानंतर '२६ एप्रिल १९७५' रोजी '३६ वी घटनादुरुस्ती' करून सिक्कीमला देण्यात आलेला सहयोगी राज्याचा दर्जा हटवून त्यास भारतात सहभागी करून घेण्यात आले आणि हा जो अनुच्छेद-२ चा खंड (क) वर्षभरापुर्वी जोडण्यात आला होता, तो निरसित म्हणजेच रद्द करण्यात आला. अनुच्छेद-२ चा वापर करून १६ मे १९७५ रोजी भारताचे 'बावीसावे घटकराज्य' म्हणून 'सिक्कीम' भारतात सामील करून घेण्यात आले.

# जीवन जगण्याचा खरा अर्थ तेव्हा कळतो...!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**या, पृथ्वीतलावर मनुष्य प्राण्यासारखा दुसरा कोणताही प्राणी श्रेष्ठ नाही याचे खरे कारण, असे की, माणूस बोलू शकतो, सुख, दुःख समजू शकतो,समजावून सांगू शकतो, शिक्षण घेऊ शकतो आणि खास करून जगातील सर्व गोष्टींविषयी माहीती गोळा करू शकतो व एक चांगला अनुभवी अभ्यासक सुद्धा बनू शकतो कारण माणूस हा जगावेगळा प्राणी असतो व आहे. म्हणून त्यासाठी ह्या, सर्व गोष्टी सहज व सोप्या असतात. आजच्या लेखाचा शीर्षक याच मानवी जीवनाच्या आधारित आहे माणसाचे जीवन जेवढे सुंदर आहे तेवढेच कुठेतरी त्याच्यात असलेल्या वागणुकीमुळे मातीमोल होत आहे म्हणून त्या माणसाला खरा जीवन जगण्याचा अर्थ कळत नाही.**


व उशीरा कळते तेव्हा, ती वेळही गेलेली असते. प्रत्येक माणसाच्या जीवनात चढ, उतार,सुख, दुःख,अडी,अडचणी, भयानक संकटे, वाईट परिस्थिती, आपत्ती, येत असतात ते आजपर्यंत कोणालाही चुकले नाही या विषयी सर्वांनाच चांगल्याप्रकारे माहीतच आहे. माणसाचे जीवन जगतेवेळी अशा बऱ्याच प्रसंगातून जावे लागते कधी,कधी न केलेल्या कर्माची फळं दुसऱ्यांच्या कर्मामुळे भोगावे लागते. त्या प्रसंगी अफाट संघर्ष करावा लागतो तर कधी उपाशी पोटी सुद्धा निजावे लागते,जेव्हा, ह्या सर्व प्रसंगातून, परिस्थितीतून,आपत्तीतून आपण शांतपणे व सत्याच्या वाटेवर चालत पार करत असतो तेव्हा ती वेळ आलेला अनुभव खूप काही शिकायला भाग पाडत असते त्या अनुभवाला व त्या वेळेला क्षणभरासाठी सुद्धा विसरू नये. उलट त्या मधून शिकायला पाहिजे की,आज हि वेळ ,परिस्थती, आपत्ती आपल्यावर आली या प्रकारची वेळ, परिस्थिती, आपत्ती समाजात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात येऊ नये आणि जर आली असेल तर.. त्याकडे दुर्लक्ष करु नये कधी काळी एखादी व्यक्ती अशा प्रसंगातून जात असेल व आपल्याला आढळून आली असेल तर निदान माणुसकीच्या नात्याने तरी त्याला मदत करावी, प्रेमाच्या दोन शब्दांचा आधार द्यावा. कारण माणूस म्हणून जन्मने एक वेळचे सोपे असते पण, आलेल्या वाईट परिस्थितीतून दिवस काढणे फार कठीण असते. आलेली हि कठीण परिस्थिती जरा जवळून बघावे सोबतच अनुभव घेऊन बघावे, व माणुसकी धर्म निभावून दाखवावे कधी काळी एखाद्या दुःखी व्यक्तीच्या चेहऱ्यावर आपण केलेल्या मदतीमुळे हास्य फुलत असेल तर. .तेव्हाच जीवन जगण्याचा खरा अर्थ आपोआप कळायला लागतो आणि हे कळायला जास्त वेळ लागत नाही. कारण, ह्या सर्व गोष्टी बाजारात कुठेही



मिळत नाही तर..स्वतः पाशीच असतात काही लोकांच्या मनात इतरांविषयी वेगळ्या प्रकारच्या नकारात्मक भावना असतात मला कोणाची गरज नाही तर..मी,इतरांचा कशाला त्याचा विचार करु ,माझ्यापाशी कशाचीही कमी नाही कशाला कोणाच्या मागे धावू असला हा गर्व व अभिमान मुळात नसायला पाहिजे.हे माणुसकीचे लक्षणे नव्हते तर..आपलं जीवन जगणं किती लोकांच्या भल्यासाठी कामी पडले हे जास्त महत्वाचे आहे. तेव्हा खऱ्या अर्थाने जीवन जगण्याचा अर्थ कळत असतो व जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते या,पृथ्वीतलावर माणसाचा जीवन मिळाला हेच तर..फार मोठे उपकार त्या निसर्गाचे आहेत त्याचे मनापासून धन्यवाद माणायला पाहिजे व त्याच्या नियमाचे पालन करण्यासाठी एक निष्ठ राहून सत्याच्या वाटेवर निःस्वार्थ भावनेने जगले पाहिजे.

पण, याच समाजातील काही लोक स्वतः पुरते जगत असतात ते,कधीही इतरांचे भले करु शकत नाही स्वतःच्या समाधानासाठी व स्वार्थ साधण्यासाठी उलट ईर्षा, तिरस्कार, निंदा, चुगली, चेष्टा, खोटे बोलून अपमान, बदनाम करण्यासाठी ते संधी सोडत नसतात. पण,याच समाजात असेही काही लोक असतात की, ते,स्वतः च्या बाबतीत विचार न करता वेळात, वेळ काढून इतरांच्या बाबतीत विचार करतात व अडी अडचणी जाणून मदतीला धावून जातात ते,लोक एखाद्या दैवी शक्तीच्या कमी नसतात म्हणून आपण देव तर.. बणू नये पण,निदान माणूस तरी बणण्यासाठी प्रयत्न करून बघावे. आजच्या घडीला एक चांगला माणूस बणणे काळाची गरज आहे म्हणून ती वेळ वाया न घालवता संधीचे सोने केले पाहिजे या,मानवी जीवनाचे मूल्य जाणून जीवन जगले पाहिजे तेव्हा खऱ्या अर्थाने जीवन जगण्याचा खरा अर्थ कळेल.. आणि तेही आपल्यावरतीच अवलंबून आहे. त्यात पुन्हा गोष्ट अशी की, सदैव आपल्या लक्षात असू द्यावे ती,म्हणजेच आपल्याकडून कोणाचेही विनाकारण मन दुखावले जाणार नाही तसेच कोणाचे वाईट झाले पाहिजे ही व्यर्थ भावना आपल्या मनात मुळात नसायला पाहिजे. तर..आपल्या कडून किती लोकांच्या जीवनात आनंद आला व ते किती समाधानी आहेत यातच जीवनाचे सार्थक समजावे.

# गुन्हेगारी नेत्यांच्या निवडणूक लढण्यावर प्रतिबंध घाला



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**ज्या नेत्यांवर गुन्हे दाखल आहेत अशा राजकीय गुन्हेगारी नेत्यांना निवडणूक लढण्यापासून जिवनभर मज्जाव करायला पाहिजे. अशा नेत्यांना आजीवन निवडणूक लढवण्यावर बंदी घालण्याची गरज आहे.राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण रोखायचे असेल तर गुन्हेगारी नेत्यांच्या निवडणूक लढण्यावर प्रतिबंध घालण्याची गरज आहे. विशेष म्हणजे यावर एक जनहित याचिका देखील सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.**

एका जनहित याचिकेवर सुप्रीम कोर्टाने आयोगाला नोटीस बजावून आपली भूमिका जाणून घेतली.गुन्हेगारांना कार्यपालिका आणि न्यायपालिकेत प्रवेश करण्यास बंदी घालण्यात यावी, असेही आयोगाचे म्हणणे आहे. राजकारणी आणि नोकरशहा यांच्यावरील फौजदारी खटल्यांचा खटला जलदगती न्यायालयांमध्ये वर्षभरात चालवण्यास निवडणूक आयोगाने पाठिंबा दिला आहे.निवडणूक आयोगाने कायदा मंत्रालयाकडे निवडणुकीतील गुन्हेगारीकरणाचा प्रस्ताव पाठवला आहे, परंतु अद्याप सरकार व विरोधी पक्षांनी यावर कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. भाजप नेते अश्विनी उपाध्याय यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करून गुन्हेगारी खटल्यांचा सामना करणाऱ्या नेत्यांना आणि नोकरशहांना निवडणूक लढवण्यापासून रोखण्यात यावे, अशी मागणी केली होती. अशा लोकांना राजकीय पक्ष काढण्यास आणि कोणतेही पद भूषविण्यास बंदी घालावी, अशी मागणीही याचिकेत करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज संस्थांसह राज्य विधिमंडळ व संसदेत अनेक गुन्हेगारी प्रसृत्तीचे उमेदवार लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेले आहेत. नुकत्याच संपंन झालेल्या कर्नाटक विधानसभेच्या नव्या सभागृहात २२४ पैकी ५५ टक्के म्हणजेच १२२ आमदार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. यातील ७१ आमदारांवर गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. यात सर्वच पक्षांच्या आमदारांचा समावेश आहे. सर्वाधिक



४२ गुन्हे बेल्लारीचे काँग्रेसचे आमदार बी. नागेंद्र यांच्यावर दाखल आहेत. या आमदारांनी उमेदवारी दाखल करताना भरलेल्या प्रतिज्ञापत्रातूनच ही माहिती उपलब्ध झाली आहे. २०१७ मध्ये ज्या पाच राज्यांमध्ये निवडूका झाल्या त्यात ६८९ आमदारांपैकी २८ टक्के आमदारांवर फौजदारी गुन्हे दाखल आहेत. उत्तर प्रदेशात १४३ आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. उत्तराखंडमध्ये २२ पंजाबमध्ये १६, गोव्यात ९ आणि मणिपूरमध्ये २ आमदारांवर गुन्हे दाखल आहेत. विद्यमान लोकसभेत २० टक्के लोकप्रतिनिधी गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत. लोकसभा निवडणुकीत २३३ विजयी उमेदवारांविरुद्ध गुन्हे दाखल होते. यांपैकी १५९ म्हणजेच लोकसभेतील तब्बल २९ टक्के खासदारांच्या विरोधात खून, बलात्कार, चोरी, दरोडे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. केरळमधील एका काँग्रेस खासदाराच्या विरोधात तर २०४ गुन्हे दाखल असल्याची माहिती त्याने प्रतिज्ञापत्रातच दिली होती. यात मारामाऱ्या, बेकायदेशीरपणे खासगी मालमत्तेत प्रवेश करणे, दमदाटी अशा विविध गुन्ह्यांची नोंद आहे. गेल्या वर्षी मुख्यमंत्रिपदी निवड झालेले आंध्र प्रदेशचे जगनमोहन रेड्डी आणि सिक्कीमचे प्रेमसिंग तमंग हे दोघे तर बेहिशेबी मालमत्ता आणि आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी तुरुंगाची हवा खाऊन आले होते. महाराष्ट्र विधानसभेत ११३ जणांच्या विरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. दोन आमदारांच्या विरोधात तर खुनाचे गुन्हे दाखल आहेत, तर ११ जणांच्या विरोधात खुनाच्या प्रयत्नाबद्दल गुन्हे दाखल आहेत. 'एडीआर इंडिया' या निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या पाहणीत, लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये गुन्हेगारी पाश्वभूमी असलेले उमेदवार निवडून येण्याचे प्रमाण प्रत्येक निवडणुकीत वाढतच असल्याचे आढळून आले आहे. हा कल तर अधिकच चिंताजनक आहे.

लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलो की गुन्हेगारी पार्श्वभूमी दबून जाते, प्रतिष्ठा प्राप्त होते. पोलिसांवर दबाव निर्माण करता येतो, या भावनेतून अनेक गुंड निवडणुकीच्या रिंगणात उतरतात. एक एक जागा जिंकणे महत्त्वाचे असल्याने राजकीय पक्षदेखील अशा गुंडांना उमेदवारी देतात. पुढे हेच 'व्हाइट कॉलर' गुंड राजरोसपणे गुंडगिरी करतात.प्रत्यक्षात गुन्हेगारी असलेले राजकारणी अनेकदा निवडणुका जिंकतात आणि सरकारचा भाग सुद्धा बनतात.आणि कायद्याच्या राजवटीची संपूर्ण संकल्पनाच नष्ट करतात.कायदा निर्माते झाल्या नंतर कायदा मोडणारे हे सुनिश्चित करतात की फक्त तेच कायदे आणि धोरणे बनविली जावीत जी त्यांच्या हितासाठी असतील. अशा प्रकारे राजकारणाच्या गुन्हेगारीमुळे भारतीय लोकशाहीला धोका निर्माण होत आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे स्वतंत्र आणि निःपक्ष निवडणुकांच्या मुळ स्वरूपाच्या विरोधात आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले राजकारणी निवडणुक प्रक्रियेला दूषित करतात. सर्वोच्च न्यायालयात याबाबत वेळोवेळी सूचना दिल्या असतानाही राजकिय पक्षांमध्ये मतैक्य होत नसल्याने राजकारणात गुन्हेगारी प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढतं आहे.

# अनियंत्रित महत्त्वाकांक्षा विनाशाच्या मार्गावर नेते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवन मार्ग सुकर झाला पाहिजे हि आयुष्यात प्रत्येकाची जीवाची इच्छा असते. मात्र अनियंत्रित महत्वकांक्षा हा या मार्गावरील सगळ्यात मोठा धोका आहे .हा धोका वेळीच ओळखता आला पाहिजे. ज्याने हा धोका योग्य वेळी ओळखला त्याला जीवन मार्गवर कोणतीही अडचण समस्या बाध्य ठरत नाही.जीवन किती हे निश्चित नाही पण मृत्यु मात्र निश्चित आहे.मृत्यू हे अंतिम सत्य आहे. शरीर हे नश्वर जरी असले तरी आत्मा मात्र अमर आहे पण आपण मात्र शरिरासाठी सगळं काही करतो पण आत्महितासाठी आपण फार काही उल्लेखनीय काम करत नाहीत. जीवन कशासाठी हे तरी आपण जाणतो आहेत का ? जीवनाचा मुख्य उद्देश काय हे समजलं तर मग मात्र आपण महत्वकांक्षेवर नियंत्रण मिळविण्यात यशस्वी होऊ शकतो.**

मुळात जिथे आति होतं तिथे माती होण हे निश्चित असतं . म्हणून नैसर्गिक न्याय तत्वानुसार आचरण केल पाहिजे आणि ज्ञान हाच जीवनाचा मुख्य आधारस्तंभ असला पाहिजे.ज्ञाना सोबत विवेक हा जागृत असले तर कुठे थांबायचे हे निश्चित समजतं आणि हे समजणं गरजेचे असत.जग जिंकणारा सिकंदर शेवटी आत्महत्या करतो .मग जीवनात अर्जित करण्या सारख नेमकं काय आहे हे समजलं पाहिजे आणि जितकं आपल्याकडं आहे ते पर्याप्त असलं पाहिजे. त्याच बरोबर मर्यादा समजली तर जीवनाचं हित होत मर्यादा समजली नाही तर मग मात्र विनाश निश्चित असतो .महत्वाकांक्षा हा जीवनाचा अविभाज्य भाग असुन.मनाची अमर्याद अवस्था असल्याने त्या मधुन दैनंदिन जीवनात वेगवेगळ्या अशा आकांक्षा निर्माण होत असतात. पण निर्माण झालेल्या अशा आकांक्षा ह्या आपलं जीवन प्रभावित करत विनाशाकडे घेऊन जाणारी नसावी.जीवन म्हटलं कि महतवकांक्षा हि आलीच पण प्रत्येक बाबीला एक नैसर्गिक मर्यादा असते . नैसर्गिक मर्यादेच पालन केलं तर महत्त्वाकांक्षा हि हितकारक ठरते आणि पालन केले नाही तर मग मात्र अनियंत्रित महत्वाकांक्षा आपल्याला विनाशकारी मार्गावर घेऊन जाते. जन्मला येताना आपण काहीच सोबत आणत नाही. जन्मा नंतर बाल्य अवस्था संपुष्टात येई पर्यंत सुद्धा आपण निरागस असतो मात्र बाल्य अवस्था संपुष्टात आली कि मग भौतिक संसारातील अनेक वेगवेगळ्या सुखाची प्राप्ती आणि संसारीक स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील असतो.या मधुनच महत्वकांक्षा जन्माला येते. त्या पुर्णते साठी मग आपण रात्रंदिवस धडपडत असतो. या धडपडीत काय काय मिळवलं पाहिजे कस मिळावायच मग त्याचे मार्ग या विचाराने आपल्या मनात सुप्त असो कि प्रकटपणे याचा अर्थ उघडपणाने अथवा कोणालाही न बोलता मनात काहितरी डाळ मात्र शिजत



असते . मनात डाळ शिजत नाही असा जीव काही अपवादात्मक व्यक्तिमत्व सोडले तर शोधून हि सापडणार नाहीत. म्हणजेच प्रत्येक जीव हा अनेक प्रकारच्या महत्वकांक्षा बाळगून असतो खरा पण बहुतांश महत्वकांक्षा ह्या स्व कल्याणार्थ असतात या मध्ये काही शंका नाही. जीवन म्हटलं कि अनेक अशा आंकाक्षा यांचा मेळा असतो .प्रत्येक व्यक्तिच्या मनातील अंतर्भाव हाच असतो कि आपला स्वतःची उन्नती झाली पाहिजे. मग उन्नती ज्या क्षेत्राशी निगडीत आहे त्या पद्धतीने महत्वकांक्षा जन्म घेत असते. मानवी मन हे अनेक महत्वकांक्षाचे भांडार असते .जीव जो पर्यंत अज्ञान अवस्थेत असतो तोपर्यंत तो सृष्टीवर दिसणारया बाबी ह्या जास्तीत जास्त आपल्याकडंच कशा असतील या साठी प्रयत्नशील असतो .लालसा मोह उत्पन्न होऊन महत्वकांक्षा वाढीस लागते आणि अनेकदा हि वाढीस लागलेली महत्वाकांक्षा आपल्या विनाशाला कारणीभूत ठरते . नैसर्गिक धर्म लक्षात घेऊन महत्तम मर्यादा समजली पाहिजे महत्वकांक्षा असणं या मध्ये गैर काहीच नाही पण त्या महत्वकांक्षेला एक मर्यादा असली पाहिजे.जेणेकरून महत्वकांक्षा हि विनाशाकडे घेऊन जाणारी ठरता कामा नये किमान एवढी दक्षता निश्चित पणे घेतली गेली पाहिजे. आपल ज्ञान हेच आपलं आयुष्य घडवत असतं म्हणून ज्ञानावर जीवन उभा असल पाहिजे.जेणेकर अनियंत्रित महत्वाकांक्षेचा जन्म होऊन आपलं आयुष्य उध्वस्त होणार नाही याची काळजी दक्षता आपण घेतली पाहिजे. सुख समाधान आनंद शांती मिळावी हा प्रत्येकाचा जीवनातील मुख्य सारांश असतो पण त्या साठी मन तृप्त होणं हाच मुख्य मंत्र आहे मर्यादीत अपेक्षा आणि ज्ञान सदृश इच्छा या फक्त ज्ञान मार्गावरच शक्य आहे.

# डिपेक्स सृजन - २०२३ मध्ये छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्वयंचलित बियाणे पेरणी यंत्राला द्वितीय पारितोषिक

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित ( सी. एस. एम. एस. एस. ) छत्रपती शाहू अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी डिपेक्स सृजन द्वारे आयोजित केलेल्या सिपना कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड टेक्नॉलॉजी, अमरावती येथे 'कृषी तंत्रज्ञान' या थीम अंतर्गत ऑटोमॅटिक सीड ड्रिलिंग मशीन या प्रोजेक्टला द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.

डिपेक्स हे महाराष्ट्र आणि गोवा राज्यांतील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रोजेक्ट्स मॉडेल्सची राज्यस्तरीय प्रदर्शन व स्पर्धा असून याद्वारे विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता, नाविन्यपूर्णता प्रदर्शित करण्याची आणि उद्योगधंद्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधण्यासाठी संधी देते. त्यामध्ये अभियांत्रिकी क्षेत्रामधील 215 पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावरील विद्यार्थी सहभागी झाले होते. या यंत्राच्या सहायाने अचूक अंतरावर पेरणी करण्यात येते, कमीत कमी जागेत जास्तीत जास्त उत्पन्न मिळवण्याकरीता विद्युत उपकरणांचा वापर करून बियाणांची पेरणी केली जाते. मक्का, बाजरी, गहू, ज्वारी, तूर या सारख्या बियाणांची पेरणी केली जाते. या यंत्रामध्ये बियाणांची पेरणी ही सेन्सरच्या साहाय्याने केली जाते. प्रॉक्सिमिटीसारख्या सेन्सर्सचा समावेश या यंत्रामध्ये करण्यात आलेला आहे.

यंत्र विकसित करण्यासाठी महाविद्यालयाच्या टीममध्ये रोहन मुरदारे, गणेश जंढे, अल्ताफ शेख, रविंद्र घाटे, महेश हेंद्रे, शेख दानियाल, गुफरान अन्सारी, अनिकेत गाडे, राणी राठोड, ओम घाडगे, सोपान भोपळे, अभिषेक अधाने, पावन कर्पे, श्रीनाथ पाटील, नितीन ताठे, गणेश शिंदे, अनिकेत साळुंके, अर्जुन मातणे, ओंकार हुगेवार, जान्हवी पाटील, मयुरी जामदार, रिया धूत, निकिता राठोड, फॅकल्टी ॲडवाईझर प्रा. सचिन लहाने, प्रा. युवराज नरवडे यांनी परिश्रम घेतले.

मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. आर. पी. चोपडे, डॉ. देवेंद्र भुयार, डॉ. मनोज मते, अंकिता ॲग्रो इंजिनीरिंगचे संचालक श्री. एस. एन. पाटील, मेकॅनिकल इंजिनीअरिंग



वर्कशॉपमधील शिक्षकेतर कर्मचारी श्री. विष्णू खडप, श्री. सुनिल जाधव व शेती अभ्यासक श्री. जनार्धन कांबळे यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

# प्रेम करा पण जरा जपून...

आधुनिक केसरी

**आज प्रेमाबद्दल जर विचार केला तर पुराणातील रामायण, महाभारत इत्यादींसारख्या कथा मालिकेतून अभ्यास केला तर प्रेमाचे अनेक अर्थ, अनर्थ व्याख्या प्रचलित आहेत. प्रेम म्हणजे नक्की काय असतं हे शब्दातून, बोलण्यातून, चालण्यातून, वागण्यातून स्पष्ट होत नाही, तर प्रेम हे आंधळं असतं एवढंच नव्हे तर प्रेमामध्ये सर्व काही माफ असतं. पण जर प्रेम विश्वासाने, सत्य आणि नि:स्वार्थ भावनेने प्रकट केलं तर त्याचं महत्त्वही स्पष्ट होतं. खरं प्रेम कोणतं आणि खोटं प्रेम कोणतं हे फक्त खोलवर रुजल्यानंतरच त्यातून प्रचिती अनुभवयास येते.**

पशु-पक्षी, झाडे, फुले किंवा माणसांवरचं माणसांचं प्रेम यांच्यातील तफावत कधी पाहिली का? गर्भात असलेल्या बाळावरील आईचं प्रेम.. ते जन्म झाल्यानंतर मुलाच्या चालण्या बोलण्यातील ते त्याच्या प्रत्येक हट्टीपणावर असलेलं प्रेम यातून खरं प्रेमाचं नातं जुळत जातं. कोणत्याही प्रेमाला रंग, रूप, आकार आणि सीमा नसते. प्रेम हे दिशाहीन असतं त्याच्याशी निःस्वार्थ भावनेने जगायचं असतं.

प्रेमामध्ये अनेक प्रकारची तंत्रे असतात, मग ती तंत्रे फक्त प्रेम युगुलांनाच ठाऊक असते. बरं.. ते प्रेम नक्की कोणाच्या परवानगीने आणि कोणाच्या पदस्पर्शाने केलं जातं याचा वृत्तांतही स्पष्ट होताना दिसत नाही. आई-वडिलांचं मुलांवरील प्रेम, भाऊ बहिणीचं, आत्या, काका, मामा, मित्रांचं तसेच इतर नातेवाईकांचं प्रेम तर कधी शिक्षक - विद्यार्थी यांच्याही पलीकडे कल्पनेच्या विश्वात जाऊन प्रेम पाहिलं तर, जमिनीचं मातीशी.. सूर्याचं चंद्राशी.. आभाळाचं ढगांशी.. असं प्रेमाचं कितीतरी गुपितं सहज उलगडली जातात. परंतु खरं प्रेम हे अंतर्मनातून स्पष्ट होताना ते दिसून येतं. एखाद्याला जरी ठेच लागली तर आई गं.. याचा उच्चार करतात ते खरं प्रेम. रस्त्यामध्ये एखादा साप आडवा आला किंवा घरात तो नजरेस पडला तर शोकदर्शकपणे बापरे! या शब्दानं मोहक होतो. अध्यात्मिक क्षेत्रात जर पाहिलं तर, भक्ताचं देवावरचं प्रेम एकाग्रतेने मनात कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता भक्ती रसात जेव्हा भक्त भक्तिभावाने तल्लीन होतो तेव्हा देवाची कृपा त्याच्यावर होऊन त्याचा एवढा जवळचा संबंध येतो की चालताना, बोलताना, झोपताना सतत परमेश्वराचं नाम घेऊन त्याचा जप



करण्यात भक्त तल्लीन होऊन जातो.

कितीतरी तत्त्वज्ञानी, कवी, लेखक, संतांनी प्रेमाबद्दल आपले विचार सांगितलेले आहेत. ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांनी" प्रेम कर भिल्लासारखं बाणावरती खोचलेलं, मातीमध्ये उगवून सुद्धा मेघापर्यंत पोहोचलेलं" यांसारख्या काव्यपंक्तीने खरोखरंच प्रेमाचं खरं सार समजून येतं. खरं प्रेम कोणी कोणासारखं करावं आणि ते कशावर करावं असा शाब्दिक आणि कल्पनात्मक व वास्तव मत कवी कुसुमाग्रज यांनी सांगितले आहे. पूर्वीच्या काळी जी माणसं होती की, जी आज नव्वदी पार झालेत, काही गेले.. तर काही अजूनही गप्पांची मैफिल कट्ट्यावर बसल्यानंतर रंगवताना हास्यकल्लोळ माजवतात. आई-वडिलांनी एखादी पाहिलेली मुलगी ही त्यांना पसंत करायला लागायची. त्यांना मुलींच्या संस्काराची, रीतभाताची एवढी पारख होती ना की, मुलांना मुलींना एकमेकांना वर पाहण्याचं धाडसही कधी होत नव्हतं. एकदम आज्ञाधारक, सुसंस्कृत, ऑलराऊंडर आणि तिच्या वागण्यात सत्यता आणि आपुलकीचे भाव असायचे. मंदिरासमोरून किंवा चौकामधून रस्त्याने जरी निघाली तरी डोक्यावरील पदर कधी इंचभर खाली उतरत नव्हता की, अंगाचा कोणताही अवयव उघडा! एवढी शिस्तबद्ध वागणूक पाहायला मिळत होती. आजच्या युगात जर पाहिलं तर पहिलीला गेलेलं मुल 'आय लव यू' म्हणताना ही दिसून येतं. टी.व्ही, मोबाईल, वर्तमानपत्र किंवा एखादं दृश्यचित्र यांसारख्या माध्यमांमधून त्यांच्यावर परिणाम दिसून येतात. त्यांना तसा दोषही देता येत नाही. जस जसं मूल वयानं वाढत जातं, तसतसं त्यांच्या हालचालीही वाढताना दिसून येतात. कधी वर्गातील मुला मुलींच्या गप्पा मारताना, आवडी-निवडीचे प्रयोग सादर होतात. एखाद्या चित्रपटातलं ना हरकत दृश्य पटकन अशी तेजबुद्धी आकर्षित होते आणि मग ते मूल जेव्हा आई-वडिलांशी मुक्तपणे आपले विचार प्रकट करतात तेव्हा त्यांना प्रेम म्हणजे काय असतं याचा उलगडा करून द्यावा लागतो. प्राथमिक शाळेपासून ते कॉलेज पर्यंतच्या प्रवासात निरागस बुद्धीने अशी मुलं मुली जीवनाचा प्रवास करतात; परंतु आपणही जर प्रेम करून पाहिलं तर कुठे काय बिघडतं? सहज एखाद्या तलावात उडी मारून पोहता येतं की नाही प्रयत्न करून पाहतात. एखाद्या मुला-मुलींचं आई-वडील काबाडकष्ट करून, तर कोणाचे आई-वडील मोठ्या सरकारी किंवा निमसरकारी मोठ्या हुद्यावर काम करतात. आपल्या मुला मुलीने चांगलं शिकून स्वतःचं भविष्य तर उजळावं हे त्यांचे स्वप्न असतं. काही मुलं आई-वडिलांपासून हजारो किलोमीटर अंतरावर शिक्षणाकरिता, तर कोणी वेगवेगळ्या कोर्सेस करीत असतात, एक विश्वासानं त्यांच्या मर्जीत राहून आपलं जीवन जगत असतात. तारुण्यवस्थेत एखाद्या मुला-मुलींना आकर्षित होणं हे सहाजिकच आहे, पण असं प्रेम मित्र-मैत्रिणींचंच असावं. अशा प्रेमातून जर एखादा मुलगा मुलगी जर आहारी गेला तर त्यांना सावरणं अवघड होऊन जातं. एकमेकांच्या आवडीनिवडी, हॉटेलिंग, सहल किंवा सहज सर्वांसोबत फिरायला जाणं इथपर्यंत गोष्टी योग्य आहेत. परंतु त्या पलीकडेही जाऊन स्वतःला जर वाहून घेतलं तर अशा मुला-मुलींना प्रेमापुढे कोणाचीही कदर नसते. प्रेमात माणूस फसतो, रडतो आणि हसतोही तर कधी हट्टापायी रुसतोही! जी खरी नाती आपल्या माणसांविषयी प्रत्यक्ष प्रेमातून दिसत नसतात तर जेव्हा त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या पाणवतात तेव्हा त्यांच्या दुःखांच्या वेदना त्यांना जाणवतात यामध्ये खरी प्रेमाची लालसा दिसून येते. प्रेमाची माणसं सदैव जागृत असतात, तर काही प्रेमीयुगूल अशी असतात ती एखाद्या हलक्या स्वभावाला स्वतःच्या जाळ्यात ओढून त्यांच्या संपत्तीचा किंवा त्यांच्या सर्वस्वाचा हक्कदार म्हणून अधिकार गाजवतात, तेव्हा आजच्या पिढीलाच नव्हे तर भविष्यातील पिढीनेही जरा थोरांचा आदर्श, गरीबीची जाणीव, आई-वडिलांचा मानसन्मान, स्वतःचा स्वाभिमान जपत प्रेम करा पण जरा जपून.. सर्व विश्वास दर्शक आणि सर्वानुमते विचारांना जागृत ठेवून वहिवाट ठेवली तर आयुष्यभर पश्चातापाची वेळही येणार नाही आणि स्वतः समाजापुढे एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून दिसून येईल. "प्रेमाने पैसा, गाडी, माडी जिंकता येते, तहानेने व्याकुळलेले मन नाही जिंकता येत, विश्वास, संयम, आपुलकी याची समज यावी लागते.

दिलीप नामदेव धायगुडे
मो.बा. ७७३८०३९१९५

# झुमरी...!



अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र.: ९७६४३५०३७४

आधुनिक केसरी

**इस्लामपूर गातात इनामदाराचे दोन- तीन जुने टोलेजंग वाडे, दोनशे एक्कर जमीन आणि त्याखालोखाल गावातील पाटील, देशमुख व इतर लोकांच्या जमिनी होत्या. पण इनामदाराचा पूर्वीपासून गावात दरारा होता, आणि माझा बाप, मी त्यांना, " बा, " असे म्हणायचो. बा इनामदाराच्या इथे सालगडी म्हणून मळ्यात कामाला. इनामदारांच्या इतर सालगड्यापैकी बा सर्वात जास्त विश्वासू व अनुभवी सालगडी. त्यांनी बऱ्याच वर्षापासून इनामदाराच्या घरात सालगडी म्हणून काम केल्याने इनामदारांसह सर्व इनामदार कुटूंबांचा बा वर फारच विश्वास होता, आणि माझा बापही उभ्या आयुष्यात त्यांच्याशी इमानदारीनेच वागून काम केलेले होते. मग स्वतःच्या घरावर कितीही कठीण प्रसंग आले तरी बा हा इनामदाराच्या कामाला अगोदर महत्व दयावयाचा.**

इनामदाराकडे दहा बैलजोडी, वीस ते पंचवीस गाई-म्हशी, शेळ्या-मेंढ्या हे पशुधन असून दहा ते पंधरा सालगडी कामाला राबत होती. बा ला इनामदाराने पाचशे रूपयांच्या उधारीवर एक वृध्द गाय दिली. बा ने ती गाय आनंदाने घरी आणली. घरातील समद्यांना आनंद झाला. मी तर आनंदाच्या भरात जागच्या जागी उडया मारल्या. तसा बा माझ्याकडे आणि एकवेळ गायीकडे पाहून मनातल्या मनात हसला.

घरात आई, मी व माझे लहान तीन भाऊ व एक बहीण असा आमुचा परिवार. आमचे साधे पत्र्यांचे घर. घराच्या शेजारीच चिंचेचे झाड आणि त्या झाडाखाली आमच्या शेळ्या बांधायची जागा होती. तेव्हा मी चौथीच्या वर्गात शिकत होतो. बाकीचे सारे लहान भाऊ-बहीण घर संभाळत असे. आई गावातील धनगर आळीतल्या,बायांबरोबर रोज मजुरीसाठी कामाला जायची. माझ्या शाळेतले वर्गमित्र हेच माझे जीवाभावाचे सवंगडी. शाळा सुटल्यावर आम्ही कधी-कधी शाळेच्या मैदानावर खेळायचो, तर केव्हा-केव्हा सुट्टीच्या दिवशी आम्ही ओढ्याकाठी पांदीच्या रस्त्याने भटकंती करून रानमेवा खायचो, आणि उन्हाळयाच्या सुटीत दिवसभर ओढ्याच्या पाण्यात डुंबणे- खेकडे, मासे पकडणे. तसेच ओढयाकाठावरील झाडावरच्या होले- पारवे या पक्ष्यांची घरटी शोधून त्यातली अंडी वा पिल्लं पाहण्यात आम्हा सर्वांना आनंद वाटे. असा आम्हा साऱ्या मित्रांचा सुट्टीतला नियोजित कार्यक्रम असे. बा ने इनामदाराकडून वृध्द गाय घरी आणल्यापासून मी फावल्यावेळेत त्या गायीला रानात- ओढयाकाठी चरायला नेत असे. आईसुध्दा शेळ्याबरोबर गायीलाही जास्तीचे गवत आणीत. दिवसेंदिवस गाईची चांगली देखभाल होऊ लागल्याने त्यामुळे गायीच्या प्रकृतीत सुधारणा होऊ लागली. आता ती पहिल्यापेक्षा चांगली धष्टपुष्ट दिसाया लागली, आणि राखोळीमध्ये दररोज रानात चरायला जाऊ लागली. एक दिवस तिने एका वासरीला जन्म दिला. ती कालवड दिसायला फारच सुंदर होती. तिच्या पाठीवर सर्वत्र पांढरा रंग व त्या रंगावर जागोजागी लाल-लाल रंगाचे ठिपके होते. त्यामुळे हे वासरू साऱ्यांच्या नजरेत भरत असे. लांब सरळ मान, कमळाच्या कळीसारखे कान, लांब शेपूट, बर्फासारखे निळे डोळे, टुनुटुनु जागीच उडया मारणे आणि चालतांना हलत-डुलत चालत असे, त्यामुळे आम्ही साऱ्यांनी तिचे नाव, " झुमरी, " असे ठेवले. झुमरी म्हणजे डुलत चालणे. झुमरी ही आमच्या गायीची माझी आवडती वासरी. मी झुमरीSऽऽ अशी साद दिली की, ती ही मला हंबरून ओरडून प्रतिसाद द्यायची. मी चिंचेच्या झाडाखाली गेलो की, ती गळ्यातल्या दाव्यासह ओढून- ओढून माझ्याकडे येण्याचा प्रयत्न करी. जेव्हा मी तिच्याजवळ जाऊन तिच्या मानेला मळायचो, पाठीवर हात फिरवायचो, तेव्हा तिला फार बरे वाटे. मग ती पूर्ण मान माझ्या खांद्यावर ठेवायची आणि तोंडाने माझ्या मानेला, दंडाला चाटायची. कधी-कधी तर दोन्ही डोळे मिटून स्तब्ध उभी राहायची, आपण म्हणालो की, झुमरी आता बस्स झाले," की लागलीच दोन्ही कान टवकारून टकामका माझ्याकडे बघायची व शांत उभी राहायची. मी शाळेत किंवा घराबाहेर पडल्यावर भाँऽs भाँsऽ



असा आवाज द्यायची, आणि मी तिच्याकडे न पाहता सरळ तिच्या जवळून गेलो की, ती मान हलवून-हलवून एकसारखी माझ्याकडे पाहायची. जेव्हा मी तिच्या नजरेआड दिसेनासा झाल्यावरच ती शांत होऊन खाली बसायची. झुमरी आता मोठी झाली. ती रानात चरायला जाऊ लागली. काही दिवसाने तिने एक वासराला जन्म दिला. तोवासरू रंगरूपाने झुमरीवरच गेला. सांज-सकाळी ती भरपूर दूध द्यायची. घरात चहासाठी दूध वापरूनही बरेच दूध शिल्लक राहत असे.ते दूध मोत्या कुत्र्याला व लालमनी मांजरीला रोज दुधाचा महाप्रसाद मिळायचा. त्यांचीही रोज दूध प्यायची मज्जा होत असे. मोती आणि लालमनी ही आमची पाळलेले कुत्रा व मांजर होते. शेवटी झुमरीला आमच्या घरातल्या एका कुटूंबातली व्यक्ती म्हणून गणना होऊ लागली. परंतु झुमरीला कुणाची नजर लागली हे कुणास ठाऊक. गावातल्या कोणीतरी अज्ञात व्यक्तीला झुमरीचे जगणे पाहवले गेले नाही, आणि त्याने सूडबुध्दीने आमच्या साऱ्यांच्या गैरहजरीत कोणती तरी विषारी पदार्थ झुमरीच्या खाण्यात टाकले. आम्ही तिला घरगुती बरीच औषधी पाजली. गुरांच्या वैद्याला दाखविले, परंतु यश आले नाही. झुमरीचा त्रास सारखा-सारखा दिवसेंदिवस वाढायचा तिच्या पोटात काय दुखत होते, हे कळत नव्हते, तिला खूप वेदना होत होत्या. म्हणून ती सारखी-सारखी जोराजोराने हंबरडा फोडून ओरडायची तिचे दुखणे हे कोणत्याही वैद्यांच्या वा गुरांच्या जाणकारांच्याही लक्षात येत नव्हते. कारण पूर्वी आजच्यासारखी आधुनिक उपचार पध्दती नव्हती. बा नेही खूप प्रयत्न केले परंतु यश काही आले नाही. जेव्हा-जेव्हा ती हंबरडा फोडून केविलवाणी ओरडायची, तेव्हा तर माझ्या काळजाचे पाणी-पाणी व्हावयाचे पण इलाज नव्हता. मी तिच्याजवळ गेल्यावर ती डोळ्यातून पाणी गाळून हंबरून ओरडायची, तसतसे माझे मन मला खायला उठायचे आणि ज्या व्यक्तीने ह्या मुक्या प्राण्यासंगे असे कपट कारस्थाने केले, मला त्याचा फार राग यायचा आणि मी त्याच्या नावाने स्वतःशीच त्याला भले-बुरे बोलायचो. एके दिवशी मी शाळेत गेलो. चार वाजेला माझी शाळा सुटली. आमच्या घराजवळच्या चिंचेखाली लहान मुले-मुलींची गर्दी व दोन- चार शहाणी माणसे झुमरीजवळ जमा झालेली मला दिसली. झुमरीने दोन्ही हातपाय ताणून देऊन ती खाली कोसळली. मी धावत-धावत गेलो, आणि झुमरीsss अशी साद दिली. झुमरीने माझा आवाज ओळखला आणि मी तिची मान माझ्या मांडीवर घेतली. तिने शेवटचा केविलवाणा हंबरडा फोडला आणि तिचे डोळ्यातून टपटप अश्रु माझ्या मांडीवर पडत होते. शेवटी तिने जोरात हातपाय ताणले व पुन्हा एक हंबरडा फोडला आणि माझ्या मांडीवर प्राण सोडला...! नकळत झुमरीसाठी माझ्याही डोळ्यातील अश्रु मला अनावर झाले.




आधुनिक केसरी

पाणी पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या सर्व जीवनांच्या काम काजाची मूलभूत गरज आहे. पाणी ही जगण्यासाठी लागणारी एक महत्त्वपूर्ण गोष्ट आहे . पाणी या ग्रहावरील मानवांना देणारी एक उत्तम देणगी आहे. पाण्याचे महत्व विषयी सांगायचेच झाले तर आपणच काय तर प्राणी सुध्दा पाण्या शिवाय जीवन जगू शकत नाही . हे सांगणे सुरक्षित आहे की जीवनाचे आधार देणारे पृथ्वी हा एकमेव ग्रह असल्याचे पाण्यामागील कारण आहे. जर पाणीच नसते तर पृथ्वीवर पशुपक्षी मनुष्य राहिलेच नसते. पाण्या शिवाय जीवन कार्य करणे अशक्य आहे. जर आपण आपल्या वैयक्तिक जीवना बद्दल बोललो तर पाणी आपल्या अस्तित्वाचा पाया आहे. मानवी शरीराला रोज जगण्यासाठी पाण्याची गरज भासते. आपण सर्व कदाचित एका आठवड्या भर अन्ना शिवाय जगू शकू परंतु पाणी नसल्यास आपण 3 दिवस जगूही शकत नाही. शिवाय, आपल्या शरीरात स्वतःच 70% पाणी असते. हे यामधून आपल्या शरीरास सामान्यपणे कार्य करण्यास मदत करते. म्हणूनच, आपण वापरत असलेल्या पाण्याचे प्रमाण आणि गुणवत्ता आपल्या शारीरिक आरोग्यासाठी आणि तंदुरुस्तीसाठी आवश्यक आहे. पुढे, आपल्या दैनंदिन कामे पाण्याशिवाय अपूर्ण आहेत. आपण सकाळी उठल्यापासून आपल्याला पाण्याची गरज भासते आंघोळ ब्रश करायला जेवण नाष्टा बनवायला पाण्याची गरज भासते म्हणूनच पाणी मानव शरीरासाठी लागणारी एक महत्वपूर्ण गोष्ट आहे. म्हणूनच पाण्याचा वापर सांभाळून करावा म्हणजे पाणी वाया जाणार नाही याचे धोरण ठेवावे कारण जर पाणीच नसेल तर मनुष्य पण राहू शकणार नाही यात्यतिरिक्त, मोठ्या प्रमाणावर, उद्योग मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करतात. त्यांच्या प्रक्रियेच्या जवळ जवळ प्रत्येक चरणात त्यांना पाण्याची आवश्यकता आहे.

# लासलगाव पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

## ८ लाख ५० हजारांचे मांस व वाहन जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** लासलगाव पोलिसांनी ३ लाख रु.किमतीचे तब्बल दीड टन मांस व वाहन असे ८ लाख ५० हजार रुपये किंमतीचा एकूण मुद्देमाल पकडला असून याप्रकरणी दोन व्यक्तींवर गुन्हा दाखल झाला आहे.

लासलगाव चांदवड रोडलगत असलेल्या गुरुद्वारा समोर एम.एच ०३ डी.व्ही १७९९ क्रमांक असलेल्या महिंद्रा कंपनीच्या पिकअप गाडीमध्ये ३ लाख किंमतीचे अंदाजे १५०० किलो मांस पिकअपमध्ये काळ्या ताडपत्रीमध्ये बर्फ टाकुन पॅक करुन विक्री करण्यासाठी वाहतुक सुरू होती. हे वाहन लासलगांव येथील चांदवड रोडवरील गुरुद्वारा समोर आल्याची माहीती बजरंग दल, हिंदू सकल समाज आणि प्राणी फाऊंडेशनच्या गोरक्षकांनी पोलीस ठाण्यात दिली. त्यानंतर लासलगाव पोलिसांनी तातडीने धाव घेऊन ३ लाख रुपये किंमतीचे अंदाजे १५०० किलो मांस, ५ लाख ५० हजार रुपये किंमतीची महिंद्रा कंपनीची पिकअप असा सुमारे ८ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. पोलीस उपनिरीक्षक शिवाजी धोंडीराम घोडे यांच्या फिर्यादीवरून दोन संशयित आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पिकअप सह आठ लाख पन्नास हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संशयित आरोपी मोबीन अबुल हसन शेख (रामु गेणू कांबळे मार्ग, कुरेशी नगर, कुर्ला ईलस्ट ग्रेटर मुंबई) इम्तियाज अहमद कुरेशी (रु नं.५ चाळ नंबर ८४ कुरेशीनगर बडी मशिद, कुर्ला ईस्ट मुंबई) यांचेवर गु.रं.न १०३/२०२३ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे सुधारित अधिनियम २०१५ चे कलम ५(क)/९(अ) सह भारतीय दंडविधान कलम ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लासलगांव पोलिस ठाण्याचे स.पो.नि. राहुल वाघ, सहा.पो.ऊ.नि.अजिनाथ कोठाळे व देविदास लाड, पो.ह.कैलास महाजन, पो.कॉ.प्रदीप आजगे, सुजय बारगळ आदींनी ही कारवाई केली असून अधिक तपास स.पो.नि.राहुल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिवाजी घोडे आणि देविदास लाड करीत आहेत.

# मुस्लिम भागात रस्ते कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** प्रभाग क्रमांक 12 मध्ये बाबा बर्तनवाले यांच्या घरापासून ते अलशबाब शाळेपावेतो काँक्रिट रस्ता व गटार करणे कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. शहरातील अल्पसंख्याक भागात मुलभूत सुविधा जसे रस्ते,गटारी,पाण्याची पाईप लाईन यासाठी आजपर्यंत लोक प्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्यामुळे या भागाचा विकास थांबलेला होता. कॉलनी व वस्त्यांमध्ये रस्ते नसल्यामुळे पावसाळ्यात नागरीकांचे हाल होत होते. त्या सगळ्या गोष्टींचा आमदार फारुख शाह यांनी अभ्यास करून ज्या भागात रस्ते नाही. गटारी नाही,पाईप लाईन नाही. यासाठी निधी उपलब्ध करून कामाचा सपाटा लावलेला आहे. मिल्लत नगर,अलशबाब शाळा परिसरातील नागरिकांची सोई सुविधांच्या आभावी प्रचंड परवड होत होती. नागरिकांची गैरसोय लक्षात घेवून आ. फारुख शाह यांनी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानअंतर्गत प्रभाग क्रमांक 12 मध्ये बाबा बर्तनवाले यांच्या घरापासून ते अलशबाब शाळेपावेतो काँक्रिट रस्ता व गटार करणे या कामासाठी ५० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. त्याचे आज आ.फारुख शाह यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. अलाशबाब संपन्न झालेल्या या कार्यक्रमास आ.शाह यांच्या सोबत जलील अहमद, साजीद साई, प्यारेलाल पिंजारी, इकबाल शाह, मौलवी शकील,छोटू माच्छिवाले, शाहिद शाह, हलीम शमसुद्दिन, कलीम अन्सारी, जाकिर शाह, इब्राहीम तांबोळी, हाजी अब्दुल रऊफ अन्सारी, मुस्ताक अन्सारी, वाहिद मास्टर, अजहर सय्यद, सउद आलम, आदी उपस्थित होते. काम सुरू झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# समाजसेवक सुमित पंडित यांना आदर्श व्यक्तिमत्त्व पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** समाजसेवक सुमित पंडित यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत ते करीत असलेल्या रजंल्या गांजल्याची सेवा खरंच समाजापुढे वाखाडण्याजोगी आहे, रस्त्यावर फिरणाऱ्या मनोरुग्णाची दाढीकटींग करुन स्वच्छ अंघोळ घालून त्यांना मनोविकृती रुग्णालयात दाखल करतात, गरजु रुग्णांना अर्ध्यारात्री वैद्यकिय साहित्य, भोजन, तसेच रक्त, पुरविण्यात दोघेही पती पत्नी देवदूता सारखी मदतीला धावून जाते, बेवारसांचे अंत्यविधी सुध्दा हे दापत्य सु-लक्षी बहुद्देशिय सेवाभावी संस्थेच्या व माणुसकी समुहाच्या माध्यमातून करतात,सुमित यांच्या पत्नी पुजा पंडीत ह्या सध्या जटवाडा रोडलगत माणुसकी वृध्दाश्रम चालवतात त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत, उभतांना सन्मानित करण्यात येणार आहे. समाजसेवक सुमित पंडित यांना या यापूर्वी विविध क्षेत्रातील ९३ पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त झुंजार छावा संघटनेच्या वतीने विवीध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार सोहळा छत्रपती संभाजीनगर येथे गुरवार आयोजीत करण्यात आला होता. सुनिल कोटकर पाटील संस्थापक अध्यक्ष,व सचीन खरात पाटील प्रदेश सचिव यांनी पुरस्कार जाहीर झाल्याचे निवड समितीतर्फे कळवीले आहे.

# होल्डिंग हँड्सचा पंजाबातील गुरुदासपूर येथे संस्कार वर्ग तसेच पंखे वाटप

आधुनिक केसरी न्यूज




**छत्रपती संभाजीनगर :** मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या अक्षम मुलांची सरकारी प्राथमिक शाळा हनुमान गेट (जिल्हा विशेष संसाधन केंद्र) गुरुदासपूर पंजाब येथे होल्डिंग हँड्स गुरुदासपूर शाखेच्या वतीने संस्कार वर्ग भरविण्यात आले. तसेच कडक उन्हाळा पाहता मुलांना हवा मिळावी म्हणून पंखे वाटप करण्यात आले आणि खाऊ ही दिले. संस्काराचा मूळ पाया म्हणजे शिस्त. प्रत्येक कृतीला जर शिस्त, नियम घालून घेतले नाहीत, तर ती कृती अपूर्ण होते. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत शिस्तीचे काटेकोर पालन केले, तर अध्यात्मातील प्रगती जलद होते. त्यासाठी लहानपणीच शिस्तीचे संस्कार बालमनावर रुजवायला हवेत, असे प्रतिपादन विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते रजनीश महंत यांनी केले. मुलांनी स्वावलंबी होणे, स्वतः चे काम स्वतः करणे, रात्री लवकर झोपणे, सकाळी लवकर उठणे, मुलांनी आपला आदर्श ठेवणे इत्यादी त्यांनी मुलांना गुरुमंत्र दिला. यावेळी अपर्णा मेहता यांनी होल्डिंग हँड्सचा परिचय दिला तर रमण पठानिया यांनी प्रास्तविक केले. अपर्णा मेहता, पूनम शर्मा, रमण पठानिया, प्रिन्सिपॉल हरप्रीत बेदी, मंजू बाला, अजित कुमारी, वरून शर्मा, गुलशन, सरिता, पूनम इत्यादी उपस्थित होते. सुरेश सिरसीकर संस्थापक अध्यक्ष असलेल्या छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था ही आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, महिला सबलीकरण,सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम आणि आपत्कालीन विषयावर काम करते. होल्डिंग हँड्सच्या पंजाब, महाराष्ट्र, दिल्ली, कर्नाटक येथे शाखा आहेत. सुरेश सिरसीकर या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून अपर्णा मेहता या संस्थेच्या सचिव आहेत.

# पहूर कसबे येथील तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पहूर कसबे येथील २३ वर्षीय तरुणाने वायरचा गळफास करून जीवनयात्रा संपविण्याची घटना पळसखेडा (ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर ) शिवारात आज बुधवारी (ता. १७) सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास घडली. वाटेतच कवटाळले मृत्यूला - अक्षय संतोष सोनवणे हा तरुण पळसखेडा येथील आत्या चंदाबाई क्षीरसागर यांच्याकडे मजुरी करण्यासाठी राहत होता. अधून -मधून तो गावी पहूरला यायचा. आज सकाळी साडे सहाला मजूरीवर न जाता तो पहूरला गावी जातो असे सांगून आत्याच्या घरून निघाला खरा, मात्र तो पहूरला पोहोचलाच नाही. वाटेतच पळसखेडा शिवारातील संतोष बोऱ्हाडे यांच्या शेतात विजेच्या खांबाला वायरचा गळफास करून त्याने मृत्यूला कवटाळले. अक्षयने या अगोदरही चार वेळा स्वतःला संपविण्याचा प्रयत्न केला. परंतू कधी भावाने तर कधी शेजारच्यांनी त्याला मृत्यूच्या पाशातून बाहेर काढले. आज मात्र त्याच्यासाठी 'काळ' ठरलेला होता. अक्षयच्या अकाली जाण्याने विधवा आईवर दुःखाचा डोंगरच कोसळला. अंत्ययात्रेतच अक्षयचा सुपारीशी विवाह लावण्यात आला. यावेळी मंगलाष्टकाचे स्वर कानी येताच उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. सायंकाळी ५ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**व्यसनमुक्तीसाठी भावाची तळमळ :** नैराश्यामुळे दारूच्या आहारी गेलेला अक्षय व्यसनमुक्त व्हावा, यासाठी त्याचा भाऊ अमोल याने पुणे येथील स्माईल व्यसनमुक्ती केंद्रात त्याला दाखल केले होते .प्रयत्नांती तो व्यसनमुक्त होवून चेहऱ्यावर 'स्माईल 'घेऊन परतला . परंतु हळव्या मनाच्या अक्षयने आज जीवनयात्रा संपवली . सोयगाव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले . डॉ .स्वप्निल घोडे यांनी दिलेल्या खबरीवरून सोयगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे . पुढील तपास सपोनि भरत मोरे फर्दापूर पोलिस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक निलेश लोखंडे करीत आहेत .

# कोळी सेना जिल्हाध्यक्षपदी भूषण कोळी

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** येथील भूषण प्रभाकर कोळी यांची भारतीय आदिवासी कोळी सेना छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष भीमराव कोळी यांनी यांनी भूषण कोळी यांची निवड केली आहे. भारतीय आदिवासी कोळी सेना संघटनात्मक वाढीसाठी व समाजातील गोरगरीब गरजू बांधवांसाठी मदत करून संघटना वाढीसाठी काम करणार असल्याचे नूतन अध्यक्ष भूषण कोळी यांनी सांगितले. ह्या निवडीबद्दल कोळी समाजातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.




# मुक्त सृजन साहित्य पत्रिकेचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार मच्छिंद्र ऐनापुरे यांना जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**जत :** मुक्त सृजन साहित्य पत्रिकेचे राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट वाड्मय निर्मितीचा पुरस्कार जत येथील साहित्यिक, शिक्षक मच्छिंद्र ऐनापुरे यांच्या 'विचारांच्या प्रदेशात' या पुस्तकाला मिळाला आहे. वैचारिक कॅटेगिरीमध्ये हा पुरस्कार मिळाला आहे. लवकरच पुरस्कार वितरण सोहळा छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

ऐनापुरे यांनी अभ्यासू पत्रकार व साहित्यीक म्हणून स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या साहित्याचा शालेय पाठ्यपुस्तकात समावेश करण्यात आला आहे. बालकथा, विनोदी कथा, व्यक्तीचित्रे व वृत्तपत्र लेख असे त्यांनी विपुल लेखन केले आहे. एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेल्या श्री. ऐनापुरे यांची आतापर्यंत दहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. यांचे 'जंगल एक्सप्रेस', 'मौलिक धन', 'गोष्टी स्मार्ट बालचमूच्या' , असेही एक रहस्य, रहस्यमयी अंगठी, माकडाचा पराक्रम, हे बालकथासंग्रह, 'हसत जगावे' हा विनोदी कथासंग्रह तर 'सामान्यातील असामान्य' हा व्यक्तीचित्रसंग्रह प्रकाशित आहे. तसेच 2022 मध्ये 'विचारांच्या प्रदेशात' हा वैचारिक लेखांचा संग्रह प्रकाशीत झाला आहे. याशिवाय सर्वच आघाडीची दैनिके, साप्ताहिके, मासिकांतून त्यांनी विपुल लेखन केले आहे. पंचवीस वर्षांपासून ते मुक्त पत्रकार म्हणून कार्यरत आहेत. 'जनप्रवास', 'केसरी','प्रभात', 'महासत्ता', 'संचार' या दैनिकात काम केले आहे. २०११पासून त्यांनी स्वतःचा ब्लॉग तयार केला असून त्यावर 2050 पेक्षा अधिक लेख लिहिले आहेत. याशिवाय चित्रपट, जनरल नॉलेज, आरोग्य, बालसाहित्य, हिंदी साहित्य, चित्रकला, प्रेरणादायी आदी विषयांवर त्यांचे लेखन विविध ब्लॉगवर , वर्तमानपत्रांमध्ये सुरू आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, पुणे यांनी 2018 या वर्षांपासून इयत्ता आठवीच्या बालभारती पुस्तकात त्यांच्या लेखाची निवड केली आहे. त्यांची 'धाडसी कॅप्टनः राधिका मेनन' ही शौर्यकथा पाठ्यपुस्तकात घेण्यात आली आहे. जत तालुक्याच्या साहित्य वैभवात भर टाकणारे ते लेखक म्हणून नावारूपास आले आहेत.

# भाभा रुग्णालयातील असुविधांविरोधात राष्ट्रवादीचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कुर्ला येथील भाभा रुग्णालयातील असुविधांबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेविका डॉ. सईदा खान यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयाबाहेर आंदोलन केले.
या आंदोलनादरम्यान औषध साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करण्यात यावा, रुग्णालयात केईएम, नायर, या रुग्णालयाप्रमाणे एमआरआयची सुविधा त्वरीत उपलब्ध करावी, रक्त चाचणी सुविधा २४×७ सुरू ठेवण्यात यावी, दुसरे शस्त्रक्रिया दालन तात्काळ सुरू करावे, शस्त्रक्रिया सकाळी ९ ते १ या वेळेत केली जाते यापुढे ती २४ ×७ केल्या जातील अशी उपाययोजना करावी, कॅथ लॅब सुविधा लवकरात लवकर सुरु करावी, रक्तपेढी सेवा सुरू करण्यात यावी, ईसीजी सेवा दरदिवशी सुरू ठेवावी, मणक्याचे एक्सरे सुविधा उपलब्ध करावी, बर्न विभाग सुरू करण्यात यावा, बाहय रुग्ण विभाग इमारतीच्या मागील शौचालयाची दररोज साफसफाई व्हावी, ईलॅब सुरू करण्यात आलेली असतानाही अतिदक्षता विभागातील रक्त नमुने बाहेर पाठवले जातात, लॅप्रोस्कॉपी यंत्रणा उपलब्ध करण्यात यावी आदींसह २३ मागण्या यावेळी करण्यात आल्या. या विविध मागण्यांचे निवेदन महानगरपालिका उपायुक्तांना (सार्वजनिक आरोग्य) माजी नगरसेविका डॉ. सईदा खान यांनी दिले.
या आंदोलनात आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेविका डॉ. सईदा खान, उत्तर मध्य मुंबई जिल्हाध्यक्ष अरशद अमीर, आयटी सोशल मीडिया सेल अध्यक्षा डॉ. सुरैना मल्होत्रा तालुकाअध्यक्ष सुनील राय, मुंबई महासचिव मुख्लेश शेख, मुंबई सचिव चंदन पाटेकर, जिल्हा महासचिव इक्बाल मलिक, जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष हनीफ खान, युवा नेते नदीम कप्तान मलिक, वॉर्ड अध्यक्ष राजेंद्र कदम, अमजद खान, मेहबूब पटेल आदी सहभागी झाले होते.



# स्वतःचे आमदार कसे सोबत राहतील याची चिंता भाजपने करावी : महेश तपासे

## भाजप आमदाराचा भाजपला घरचा आहेर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विकास निधी मिळत नसल्याची तक्रार वर्ध्याचे भाजप आमदार दादाराव केचे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करुन नाराजी व्यक्त करत भाजपला घरचा आहेर दिला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या एकजूटीची चिंता न करता स्वतःचे आमदार कसे सोबत राहतील याची चिंता भाजपने करावी असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी केला लगावला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात आमदारांना विकास निधी मिळत नसल्याची तक्रार भाजप व शिंदे गटाचे नेते नेहमी ओरडून - ओरडून करत होते. शिवाय या निधी वाटपावरून आघाडी तुटणार असे वक्तव्य करत होते मात्र आज भाजप आमदारच विकास निधी मिळत नसल्याची तक्रार करत आहेत याकडे महेश तपासे यांनी लक्ष वेधले आहे.
भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा हे मुंबईत आले असतानाच भाजप आमदार दादाराव केचे यांनी ही तक्रार केली आहे त्यामुळे या तक्रारीला अधिक महत्त्व आले आहे असेही महेश तपासे म्हणाले.

# भाजपच्या बडतर्फ जिल्हाध्यक्षाकडून प्रतारणा व्हिडीओ व्हायरल करत आत्महत्येचा प्रयत्न!

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** निर्मला यादव या महिलेने भाजपचा बडतर्फ जिल्हाध्यक्ष श्रीकांत देशमुख याच्याकडून प्रतारणा झाल्याचा आरोप सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडिओद्वारे करून गुरुवारी दुपारी आत्महत्येचा प्रयत्न केला. यासाठी निर्मालाने एरंडाच्या बिया खाल्या. तिच्यावर सांगोला येथे उपचार सुरू आहेत. आज सकाळी निर्मला यादव हिने जवळा ता सांगोला येथील श्रीकांत देशमुख यांच्या देशमुख वस्ती येथील घरापुढे येवून घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तिने श्रीकांत देशमुख यांचे वडीलांना भेटण्याचा प्रयत्न केला. मात्र श्रीकांतचा भाऊ लालासाहेब देशमुख यांनी तुमचा नवरा येथे रहात नाही, जिथे रहातो तिकडे जावा म्हणून हाकलून दिले. त्यांनंतर त्या तेथून सरळ सांगोला पोलीस स्टेशन ला येवून मी एरंडीच्या बियाणे खाल्ल्याचे सांगितले पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांनी तिला तात्काळ उपचाराकरता सांगोला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले त्या ठिकाणी पोलीस अधिकारी तिची चौकशी करीत आहेत. निर्मलाने एरंडाच्या 40 बिया खाल्या त्यामुळे रक्तदाब वाढला असून सध्या प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.





# पाणी टंचाईबाबत राष्ट्रवादीचे पालिका आयुक्तांना निवेदन

## राष्ट्रवादी मनपावर काढणार हंडा मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज धुळे महानगरपालिका व भाजपाच्या विरोधात पाणी टंचाई व पाणी समस्याबाबत शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली धुळे महानगरपालिकेचे आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.
धुळे शहरामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. महानगरपालिकेच्या ढिसाळ व शून्य नियोजनामुळे शहरामध्ये पाणी वेळेवर येत नाही असा आरोप करीत राष्ट्रवादी पदाधिकारी व कार्यकर्ते पालिका आयुक्तांजवळ पोहोचणे.
वेगवेगळ्या परिसरामध्ये, कॉलनी, मोहल्यामध्ये आठ-दहा दिवसांनंतर तर काही ठिकाणी पंधरा दिवसानंतर पिण्याचे पाणी येत आहे. त्यामुळे नागरिकांचे अतोनात हाल होत आहे. नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. धुळे महानगरपालिकेत भाजपाची सत्ता आहे. भाजपाने सत्तेवर येण्यापूर्वी सन 2018 मध्ये आपल्या जाहीरनाम्यात / वचनात धुळेकर जनतेला दररोज पाणी देवू असे आश्वासन दिलेले होते. सन 2018 ते 2023 जवळपास साडेचार वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी धुळेकर जनतेला वेळेवर पाणी मिळत नाही.
भाजप व महानगरपालिकेच्या ढिसाळ नियोजनामुळे लोकांना वेळेवर पिण्याचे पाणी मिळत नाही. महाराष्ट्र शासन व महाविकास आघाडी पाणीपुरवठा योजनेसाठी महानगरपालिकेला शेकडो करोंडाचा निधी दिला. परंतु भ्रष्ट कारभारामुळे सदर योजना वेळेवर पूर्ण होवू शकत नाही. महानगरपालिका दोन ते चार पटीने घरपट्टी वाढवित आहात. पण वेळेवर तूम्ही जनतेला पाणी देवू शकत नाही ही मोठी शोकांतिका आहे. जे पाणी येते त्यामध्ये मोठ्या प्रमाणात घाण असते. गढूळ पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहिला आहे. सदर पाणी टंचाईचा प्रश्न हा येत्या आठ दिवसांत निकाली काढावा अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महानगरपालिकेत हंडा मोर्चा काढला जाईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महानगरपालिकेला देण्यात आला.
यावेळी रणजीत राजे भोसले, जोसेफ आण्णा मलबारी, गोरख शर्मा, भानूदास लोहार, यशवंत डोमाडे, भिका नेरकर, मंगेश जगताप, जगन ताकटे, राजू सोलंकी, संजय माळी, संजय नेरकर, डी.टी.पाटील, जितू पाटील, राजू चौधरी, रईस काझी, अमित शेख, शोएब अन्सारी, सोनू घारु, शेख समद, मसुद अन्सारी, बरकत शहा, भटू पाटील, एजाज शेख, विशाल केदार, चेतन पाटील, सागर चौगुले, भूषण पाटील, शकीला बक्ष, मंगला मोरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत जवान ठार

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** चुलत बहीणीच्या लग्णानिमित्त रजे वर आलेल्या सीमा सुरक्षा दलाचा जवान अज्ञात वाहणाच्या धडकेत जगीच ठार तर १ जण जख्मी झाल्याची घटना ता.१७ ला रात्री ९ वाजे दरम्याण लोणार तालुक्यातील औरगांबाद राज्य महामार्गावर भानापुर जवळ घडली. प्राप्त माहीती नुसार सुलतानपूरपासून जवळच असलेल्या येसापूर येथील भारतीय सैन्य दलाचे जवान विकास शालिकराम गायकवाड (वय ३०) वर्ष हे आपल्या चुलत बहीणीच्या लग्नासाठी रजेवर आपल्या गावी येसापुर येथे आले होते. दरम्यान ९ वाजे दरम्यान नागपूर - औरंगाबाद हायवेवरुण अंजनी खुर्दकडून आपला मित्र किशोर शंकर धांडे वय ३४ यांच्या सह दुचाकी क्रमांक MH २८ - २४५७ ने घर परतत असताना भानापूरजवळ अज्ञात वाहणाच्या धडकेत सैनिक विकास गायकवाड जागीच ठार झाले तर त्यांचा मित्र किशोर धांडे गंभीर जख्मी असुन मेहकर येथील हाऊस्पिटल मध्ये उपचार घेत आहे. मृतक जवान विकास ला १ मुलगा, मुलगी, पत्नी आई वडील असा परिवार आहे विकास हा ९ वर्षापुर्वी भारतीय सैन्य दलात भरती झाला होता. मात्र आर्धावरच त्याला जगाचा निरोप घ्यावा लागला सैनिक विकास हे आई वडीलास ऐकुल ते एक पुत्र असुन त्यांना दोन बहीणी असल्याची माहिती आहे. परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटणे चा पुढील तपास मेहकर पोनि निर्मला परदेशी यांच्या मार्गदर्शनात पोहेकॉ रामेश्वर कोरडे, पोकॉ राजेश जाधव करीत आहेत.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# शेगावात प्रौढ व्यक्तीचा उष्माघाताने बळी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** शेगावात बुधवारी उष्माघाताने एका प्रौढ व्यक्तीचा मृत्यू झाल्याने संतनगरीसह आरोग्य सेवा वर्तुळात खळबळ उडाली आहे. यंदाच्या उन्हाळ्यातील उष्माघाताच्या बळीची ही विदर्भातील पहिलीच घटना असल्याचे मानले जात आहे. आदेश भाऊराव शेगोकार (४९, रा. जोगलखेड, ता. बाळापूर, जि. अकोला) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी शेगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यू अंतर्गत घटनेची नोंद केली आहे. सईबाई मोटे सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खेताडे यांच्यातर्फे कक्षसेवक प्रभाकर घनोकार यांनी घटनेची फिर्याद दिली.

# शेतकरी शेतमजूर विकास पॅनलचे 13 उमेदवार विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** शेकापूर सेवा सहकारी सोसायटी निवडणुकीत,शेतकरी शेतमजूर विकास पॅनलचे 13 पैकी 13 उमेदवार विजयी झाले. कंधार तालुक्याचे लक्ष लागलेल्या शेकापूर सेवा सहकारी सोसायटी च्या निवडणुकीमध्ये शेतकरी शेतमजूर विकास पॅनलचे सर्वच उमेदवार विजयी झाले. तालुक्यातील सर्वात मोठी सोसायटी असलेल्या शेकापूर, तळ्याचीवाडी, संगमवाडी, ढाकू नाईक तांडा, काशीराम तांडा, हिरामण तांडा , रामा तांडा,गणा तांडा, परिसरातील सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीमध्ये पुढारी मंडळींनी ही निवडणूक बिनविरोध व्हावी म्हणून प्रयत्न केले या साठी कंधार पंचायत समितीचे माजी उपसभापती तथा जि.प.सदस्य संभाजीराव पाटील केंद्रे , कंधार पंचायत समितीचे माजी सदस्य



किसनराव डफडे,भाजपाचे तालुकाध्यक्ष भगवान राठोड, माजी सरपंच, शिवाजीराव पाटील केंद्रे, माजी सरपंच बाळासाहेब गर्जे, प्रभाकर केंद्रे, विश्वनाथ गर्जे, राजीव केंद्रे ,संगमवाडीचे सरपंच ज्ञानोबा घुगे, नामदेव केंद्रे यांनी प्रयत्न केले परंतु निवडणूक झाली या निवडणुकीत एकुण मतदान 429 पैकी 303 मतदान झाले. तर शेतकरी शेतमजूर विकास पॅनलचे १३ पैकी १३ उमेदवार मोठ्या मताधिक्याने मताने विजयी झाले, शेकापूर सेवा सहकारी सोसायटी निवडणूक परिसरातील मतदाराने शेतकरी शेतमजूर विकास पॅनलच्या बाजूने एकतर्फी मतदान करून 13 संचालकांना निवडून दिले. निवडून आलेले उमेदवार खालीलप्रमाणे सर्वसाधारण गटातून नामदेव निवृत्ती केंद्रे, गोविंद भानुदास गर्जे, ज्ञानोबा हणमंत घुगे, नामदेव सोमशिंग चव्हाण, सखाराम मोतीराम जाधव, किसन व्यंकटरावं डफडे, रामकिशन कांतीराम पवार, अशोक सटवाजी मुसळे नामाप्र गटातून बाबू गंगाधर तांबोळे विमुक्त जाती गटातून, शिवाजी संभाजीराव पाटील केंद्रे, अनु जाती, गटातून, बालाजी कामाजी वाघमारे, महिला राखीव, कांताबाई ज्ञानोबा डफडे, कमलबाई श्रीहरी मुंडे हे विजयी झाले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून बालाजी बोधगिरे तर मतदान अधिकारी बालाजी जवाद्वार, राजेश गुट्टे, माधव कांबळे, अरुण भांगे ,वरताळे साहेब ,गजानन श्रीमती माया मठपती, केंद्रअध्यक्ष जी एस चिले, सचिव संजीव कुमार तेलंगआदींनी काम पाहिले. निवडणूक यशस्वी करण्यासाठी सरपंच संजय भुस्कटे, उपसरपंच मोरेश्वर मोरे, ग्रा.पं. सदस्य, गणपतराव केंद्रे , प्राचार्य मोती भाऊ केंद्रे, चेतन केंद्रे, सोनबा मंगनाळे उपसरपंच खुशाल तांबोळे ग्रा.पं. सदस्य राजीव केंद्रे, चक्रधर घुगे ,पत्रकार एस. पी. केंद्रे, भगवान डफडे, बालाजी केंद्रे, मुकेश केंद्रे, प्रभाकर सोळंके ,बालाजी डफडे, नागण डफडे, त्रिभुवन मोरे, रामराव जाधव, बालाजी मुंडे, अरुण केंद्रे, राजीव केंद्रे, प्रभाकर केंद्रे, परमेश्वर घुगे, अंकुश पवार, मोहित केंद्रे आदिने सहकार्य केले. निवडुन आलेले उमेदवार यांचे कंधार पंचायत समितीचे माजी उपसभापती तथा जि.प.सदस्य संभाजीराव पाटील केंद्रे व मा.सरपंच बाळासाहेब गर्जे यांनी तेरा ही उमेदवार यांचे पुष्पहार घालून स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

# शिक्षकांची रिक्त पदे न भरल्यास जि. प.समोरच भरविणार शाळा

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील कापूसवाडी येथील (ता. १६) बदली प्रक्रियेमुळे रिक्त झालेली शिक्षकांची ६ पदे १५ जून पर्यंत न भरल्यास नवीन शैक्षणिक वर्षात शाळेत एकही विद्यार्थी न पाठविता जिल्हा परिषदेसमोरच शाळा भरविणार असल्याचा आक्रमक पवित्रा कापूसवाडी (ता. जामनेर ) येथील सरपंच,उपसरपंच , शाळा व्यवस्थापन समितीसह ग्रामस्थांनी घेतला असून जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांना लेखी निवेदन सादर केले आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याची ओरड सगळीकडूनच ऐकायला मिळते . परंतू कापूसवाडी येथे मुबलक विद्यार्थी असून देखील शिक्षकांची ६ पदे रिक्त असल्याने गोरगरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी आवाज उठवला आहे. यासंदर्भात शिक्षणाधिकारी विकास पाटील यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कापूसवाडी येथे जिल्हा परिषदेची १ ली ते ४ थी पर्यंत शाळा असून सुमारे २ २ ४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत . मात्र बदली प्रक्रिये अंतर्गत पाच शिक्षकांची बदली झाली असून केवळ ३ शिक्षक आज रोजी कार्यरत आहेत. कापूसवाडी ग्रामीण भागातील गाव असून सर्व गोरगरीब कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थी असून पर्यायी शिक्षणाची सोय नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. हे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी गाव एकवटले असून प्रशासनाला धारेवर धरत शिक्षकांची मागणी करत आहे . 15 जून पर्यंत रिक्त पदांवर शिक्षक उपलब्ध करून न दिल्यास शाळेत एकही विद्यार्थी न पाठविता जिल्हा परिषद कार्यालयासमोरच विद्यार्थ्यांची शाळा भरविणार असल्याचा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे . नुकतेच याविषयी जळगाव येथे प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले .यावेळी सामाजिक कार्यकर्ते महेंद्रसिंग नाईक, दगडू कोळी, पोलीस पाटील संजय पाटील, विकास पाटील, पंडित बारबुदे, प्रमोद बेलदार, विलास राठोड, भगवान तेली, राजेंद्र बेलदार, अशोक शिंदे, भागवत काशीकर, गजानन थोरात आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लग्न समारंभाला होतोय उशीर; भर उन्हात नेत्यांची दमछाक

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात सध्या राजकीय नेते, पुढारी यांची उपस्थिती लग्नात असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण बनत चालले असल्यामुळे अगदी लग्न पत्रिकांमध्ये देखील नेते मंडळींच्या नावांची रेलचेल असल्याने नेत्यांची भर उन्हात दमछाक होत आहेत. लग्न समारंभामध्ये सर्वच पक्षांचे राजकीय नेते, पुढारी यांची नावे टाकण्यावर भर असतो. सोयगाव तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील आजी- माजी पदाधिकारी, राजकीय नेते, कार्यकर्ते यांच्या नावांचा भरणा अधिक असल्याचे चित्र दिसून येत आहे. अशा पद्धतीने राजकीय नेते, पुढारी लग्न सोहळ्यांमध्ये आले तरच विवाह समारंभास भव्यदिव्य स्वरूपाच प्राप्त होत असल्याचा अविर्भाव वधू-वर दोन्ही बाजूच्या मंडळींचा असतो. मात्र, राजकीय नेत्यांची उपस्थिती असलीच पाहिजे व राजकीय नेते आणि पुढाऱ्यांच्या उपस्थितीतच लग्नसोहळा पार पडावा अशा अट्टहासापायी लग्नांना उशीर होत असल्याचेही चित्र आहे. लग्नसोहळ्यामध्ये केले जाणारे सत्कार समारंभ म्हणजे आपल्या राजकीय व समारंभ म्हणजे आपल्या राजकीय व सामाजिक प्रतिष्ठेचे ओंगळवाणे प्रदर्शन तर नाही ना, याचाही विचार होणे अत्यंत गरजेचे आहे.

रूढी, परंपरेनुसार मुला-मुलीच्या पसंतीनंतर मुहूर्त काढला जातो आणि त्या मुहूर्तावरच लग्न लागावे असे ठरविले जाते; पण पुढाऱ्यांच्या उपस्थितीच्या अट्टहासापायी खरंच किती लग्ने या ठरविलेल्या मुहूर्तांवर लागतात, हा संशोधनाचाच विषय आहे. तालुका आणि जिल्हा पातळीवरील राजकीय नेत्यांना आपल्या राजकीय कार्यक्षेत्रातील प्रत्येक कार्यकर्ता हा जवळचाच असतो. मात्र, प्रत्येक कार्यकर्त्याला फक्त तालुक्यातीलच अथवा राजकीय नेत्यांच्या कार्यक्षेत्रातीलच सोयरीक मिळेल असे मात्र होऊ शकत नाही. त्यामुळे राजकीय नेत्यांनाही लग्नसमारंभांना उपस्थित राहण्यासाठी मोठी धावपळ करावी लागते. एकाच दिवशी जर अनेक लग्नातील वर राजकीय नेते मंडळींची ही दमछाक होते. शेवटी वेळेची आणि अंतराची मर्यादा त्यांनाही येतात. कारण काही लग्न ही दूरची असतात, परंतु कार्यकर्त्यांची मर्जी राखणे हेही तितकेच महत्त्वाचे असल्यामुळे मग राजकीय नेत्यांनाही नाईलाजास्तव लग्नाला उशीर होतो, परंतु यामुळे लग्न सोहळ्याकरिता उपस्थित राहणारे हजारो वऱ्हाडी मंडळी यांना काहीच महत्त्व नाही का, असाही प्रश्न निर्माण होतो.

# मालगाडीच्या दोन वॅगन रुळावरून घसरल्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** रासायनिक खते घेऊन जाणाऱ्या मालगाडीचे दोन वॅगन नागपुरातील कळमना रेल्वेस्थानकापासून काही अंतरावर बुधवारी रात्री रुळावरून घसरले. हा अपघात अतरिक्त रेल्वेमार्गावर (कॉर्ड लाईनवर) झाल्याने वाहतुकीवर परिणाम झाला नाही. मालगाडी रुळावरून घसरल्याचे कळताच रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघात बचाव पथक (एआरटी) घटनास्थळी पाठवून वाहतूक पूर्ववत करण्यात आली. ४० वॅगन असलेली ही मालगाडी नागपूरमार्गे खंडवाकडे निघाली होती. कळमना रेल्वे स्थानकापासून काही अंतरावरील ‘कॉर्ड लाईन’वरून बुधवारी रात्री आठ वाजता ही गाडी हावडा मार्गावर जाणार होती. मात्र, मुख्य मार्गावर पोहोचताच दोन वॅगन रुळावरून घसरल्या. दोन वॅगन गाडीपासून वेगळ्या करण्यात आल्या आणि गाडी पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आली.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर